# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जुले १९८४ ) गुरु पौर्णिमा विशेषांक ( एक रुपया

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

वर्ष ६३ वे )　　किंमत १ रुपया　　( अंक ४

श्रीसाईलीला जुलै १९८४　　दूरध्वनी

गुरुपौर्णिमा विशेषांक　　८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर. मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

"कोणींही केल्या माझें कीर्तन ।
तयासी देईन आनंदघन ।
नित्य सौख्य समाधान ।
सत्य वचन मानावें ॥१४॥

जो मजलागीं अनन्य शरण ।
विश्वासयुक्त करी मद्‌भजन ।
माझें चिंतन माझें स्मरण ।
तयाचें उद्धरण ब्रीद माझें ॥१५॥

माझें नाम माझी भक्ती ।
माझें दफ्तर माझी पोथी ।
माझें ध्यान अक्षय चित्तीं ।
विषय स्फूर्ती कैंची त्यां ॥१६॥

कृतांताच्या दाढेंतून ।
काढीन मी निजभक्ता ओढून ।
करितां केवळ मत्कथा श्रवण ।
रोग निरसन होईल ॥१७॥

कथा करा सादर श्रवण ।
त्यावरी करा पूर्ण मनन ।
मननावरी निदिध्यासन ।
समाधान पावाल" ॥१८॥

— श्री साईसच्चरित अध्याय ३ रा.

# सुविचार

नारिकेल समाकारा दृश्यन्तेऽपि हि सज्जनाः
अन्ये बदरिकाकारा बहिरेव मनोहराः ॥

सज्जन लोक नारळासारखे म्हणजे बाहेरून खडबडीत व कठोर पण आतून मधुर रसाने प्रेमाने भरलेले असतात. इतर सामान्य लोक बोरासारखे केवळ बाहेरून रमणीय दिसणारे असे असतात.

सारांश – वस्तूची किंवा व्यक्तीची उच्च नीचता ठरवावयाची ती तिच्या बहिरंगावरून नव्हे तर अंतरंगावरून, अंतस्थ गुणांवरून.

★

# अनुक्रमणिका जुलै १९८४


| | |
|---|---|
| १) संपादकीय | — सद्‌गुरु साईबाबा व साधक |
| २) शिरडीची यात्रा कशी सफल करावी | — श्री. मु. ब. निंबाळकर. |
| ३) सद्‌गुरु म्हणजे ज्ञानदीप | — श्री. लक्ष्मणराव रापतवार. |
| ४) बाबांनीच बरे केले | — सौ. अंजली शहा |
| ५) गुरुपौर्णिमा | — श्री. बाळकृष्ण देसाई. |
| ६) माझे दोन अनुभव | — श्रीमती कुसुम माणिक. |
| ७) गुरुपौर्णिमा | — श्री. अरविंद बारटक्के. |
| ८) जया मनी ... | — ॲड. के. के. थिटे. |
| ९) समर्थ साईनाथ — लोकशिक्षण | — डॉ. अ. का. पाठक. |
| १०) परदेशातील माझा अनुभव | — श्री. अनिल राजाध्यक्ष. |
| ११) बाबांचा मूर्तिमंत साक्षात्कार | — श्री. मधुकर अंबाडे. |
| १२) एक आधार श्रीसाई | — सौ. शोभा जोशी |
| १३) सूनेचा हार सापडला. | — सौ. शकुंतला हळदणकर. |
| १४) श्री बाबांचा कृपाप्रसाद | — कु. उज्वला दीक्षित |
| १५) जो जो मज भजे | — सौ. उषा जोशी |
| १६) आणि मी पास झालो. | — श्री. अनिल आकेरकर |
| १७) साई भक्तजनांसी तारी | — सौ. सुशिला शेवडे. |
| १६) काळाच्याही दाढेतून | — सौ. मेघना कोलवाडकर. |
| १७) पारल्याचे साईभक्त श्री. भिडेकाका | — साईनंद |
| १८) नवापूरचे श्री साईभक्तांचे संमेलन | — |
| १९) शिरडी—वृत्त | — एप्रिल — १९८४. |


## शिरडीतील गुरुपौर्णिमा उत्सव

दर वर्षा प्रमाणे शिरडी येथे श्री गुरुपौर्णिमा उत्सव यंदाही बुधवार ता. ११—७—८४ ते शुक्रवार ता. १३—७—८४ अखेर असे तीन दिवस साजरा होणार आहे. तरी भक्त मंडळींनी हेच निमंत्रण समजून उत्सव प्रसंगी आपले कुटुंबिय व स्नेही मंडळीसह हजर राहून सर्व कार्यात सहभागी होऊन संस्थानलाही सह-कार्य करावे अशी विनंती न्यायालय धारक श्री. क. हि. काकरे साहेब, श्री साईबाबा संस्थान शिरडी हे करतात. संस्थानच्या दादर येथील कार्यालयात हाच उत्सव गुरुवार ता. १२—७—८४ रोजी साजरा होईल. दुपारी १२ वा. आरती व त्यानंतर तीर्थप्रसाद होईल.

# सद्गुरु श्रीसाईबाबा व साधक

**********************

स. न. वि. वि.




माणूस हा आपल्या जीवनाचा शिल्पकार आहे. तोच आपले जीवन घडवित असतो. मानवी जन्म ही मानवाला मिळालेली श्रेष्ठ आणि पवित्र अशी देणगी आहे.

मनुष्य हा केवळ इच्छा–आकांक्षा यामुळे कार्यप्रवृत्त होत असतो. त्यांची पूर्तता होण्याकरिता तो योजना आखत असतो. परंतु कांहीवेळा त्यामध्ये अपयश देखील येण्याची शक्यता असते. त्यामुळे आपली इच्छा–आकांक्षा पूर्ण होत नाहीं.

कोणत्याही गोष्टींमध्ये अपयश आले तर ते झेलून पुन्हां ताठ खडे राहण्यातच खरी मजा आहे, शौर्य आहे. अपयशाच्या तडाख्याने खचून न जाणे हेच खरे जीवन आहे.

पवित्र शुद्ध अंतःकरण, निष्ठा, धीर आणि चिकाटी यांची यशाकरिता आवश्यकता आहे.

मानवी जीवन हे क्षणभंगूर आहे. या क्षणभंगूर जीवनाचे सार्थक जर आपणांस करून घ्यावयाचे असेल तर त्याकरिता साईभक्ती हा दैदिप्यमान चिंतामणी आहे. या चिंतामणीच्या सहाय्याने आपण आपल्या जीवनाचे सार्थक करून घेऊ शकतो.

परमेश्वराची भक्ती ही शिदोरी असून ती जन्मभर पुरून उरणारी आहे. दिवा प्रज्वलीत करण्याकरिता तुपाची जरूरी असते, त्याप्रमाणे साईंच्या भक्तीला श्रद्धेची जरूरी असते

तेव्हां आपण सर्वजण साधक आहोत, भक्त आहोत. साधकाने विरक्तीची वात भक्तीच्या तुपात भिजवून ठेवली तर आपले सद्गुरु श्री साईबाबा त्या वातीला ज्ञानाची ज्योत लावून ती प्रज्वलित केल्याशिवाय राहणार नाहींत.

साधकाने कोणत्याही परमेश्वराची भक्ती करीत असतांना त्याकरिता सुसंस्कारास अतिशय महत्त्व असते. ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे.

मडके जोपर्यंत कच्चे आहे, भट्टीत घालून ते पक्के केले गेले नाहीं. तोपर्यंत त्याला पाण्यापासून जपलेच पाहिजे. एकदा ते पक्के झाले की, मग मात्र त्याला कितीही वेळा पाण्यात बुडविले तरी हरकत नाहीं.

त्याचप्रमाणे मनुष्य जोपर्यंत साधकावस्थेत आहे तोपर्यंत त्याने सर्व प्रकारच्या कुसंस्कारापासून स्वतःला पूर्णपणे सांभाळलेच पाहिजे. एकदा तो सिद्धयोगी बनल्यानंतर त्याच्यावर दुसऱ्या कोणाच्याही कुसंस्कारांचा सहसा परिणाम होत नाहीं.

परमेश्वराला नेहमी शांती, धीर, सबुरी आवडत असते. त्याप्रमाणे वागणे हे मानवाचे कर्तव्य आहे.

भक्ताची काळजी बाबा ह्यात असतांना तर घेत असतच परंतु आज देखील बाबा भक्तांची काळजी घेतातच यावर पूर्ण विश्वास ठेवा.

मनुष्य प्रपंच करीत असतांना तो अहोरात्र धडपड करीत असतो. त्यामध्ये काहीं कमतरता राहू नये याकरिता त्याला बऱ्याचशा यातना भोगाव्या लागतात त्रास सहन करावा लागतो. परंतु काहींवेळा त्याचा त्यामध्ये शेवट होतो.

भ्रमर हा फुलातील मकरंद सेवन करीत असतांना त्यामध्येच रंगून जाऊन त्याचा शेवट तिथेच होतो. त्याप्रमाणे मानवाचे देखील असेच आहे. याकरिता परमार्थ, ईश्वरभक्ती हाच एकमेव मार्ग आहे.

वर निवेदन केल्याप्रमाणे सुसंस्काराविषयी सांगावयाचे म्हटले तर खरे ईश्वरभक्त संत श्री नामदेव महाराज यांची सत्यघटना सांगाविशी वाटते ती अशी —

प्रत्यक्ष देवाशी बोलणाऱ्या व देवाला स्वतःच्या हातांनी खाऊ घालणाऱ्या परमभक्त नामदेवाच्या भक्तीची देखील सत्वपरीक्षा घेण्यात आली.

एके दिवशी गोऱ्या कुंभाराच्या घरी संत मेळा भरला होता. या संत मेळ्यामध्ये नामदेवांना कच्चे मडके म्हणून ठरविले गेले. नामदेवांच्या डोक्या-

मध्ये लाकडी थोपटणे बसताच त्यांना तीव्र वेदना झाल्या. गोरा कुंभार सर्व संत मंडळींच्याकडे पाहून म्हणाले, अरे! हे तर कच्चे मडके आहे. त्यावेळी तिथे हजर असणारी सर्व संत मंडळी नामदेवांच्याकडे पाहून हसू लागली. त्यामुळे नामदेवांना अपमान वाटला. त्या अपमानामुळे नामदेव रागारागाने तेथून उठले आणि सरळ श्री विठ्ठल मंदीरात गेले, आणि विठ्ठलांना म्हणाले,

"देवा! तुम्ही प्रत्यक्ष परमेश्वर, संपूर्ण विश्वाचे गुरु असतांना मला गोऱ्या कुंभाराने सर्व संतासमोर कच्चे मडके म्हणून का म्हटले असावे?"

तेव्हां विठ्ठल म्हणाले, नामदेवा! तुझ्या परमपवित्र व अनन्य भक्तीमुळेच मी तुझ्यावर प्रसन्न झालो आणि तुझ्याबरोबर बोलू लागलो. परंतु भक्ती करीत असतांना गुरुंच्या योग्य संस्काराशिवाय, पर्याय नाहीं.

मनुष्य जीवनात गुरुला अनन्य साधारण महत्त्व आहे. गुरु नसेल तर मानवी जीवन निष्फळ ठरते. जीवनाचा मार्ग शोधण्यासाठी गुरुची नितांत आवश्यकता आहे. खरा गुरु शिष्याला ज्ञानवंत बनवतो. आपल्यापेक्षा श्रेष्ठ बनवतो.

त्याप्रमाणे श्री विठ्ठलांनी विसोबा खेचर नावाच्या गुरुंकडे जाण्याकरिता नामदेवांना आज्ञा दिली.

नामदेव त्याप्रमाणे विसोबा खेचर यांचेकडे गेले. त्यावेळी विसोबा खेचर हे आपल्या पायातील जोड्यासहित श्री शिव शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून झोपलेले होते. ते पहाताच आपणांस विठ्ठलांनी अज्ञानी, पापी गुरुकडे पाठविले याबद्दल नामदेवांना विठ्ठलांचा राग आला, त्याप्रमाणे त्या अडाणी, पापी गुरुचा ही राग आला. त्या रागाच्या भरात नामदेवांनी त्या गुरुचे पाय आपल्या हातांमध्ये धरुन ते जोरात जमिनीवर आपटले. परंतु तेथेही नामदेवांना त्या गुरुच्या पायांखाली श्री शिवशंकराची पिंडी दिसली. त्यामुळे नामदेवांनी अधिकच चिडून जाऊन पुन्हां त्या गु चे पाय उचलून दुसरीकडे आपटले. परंतु तेथेही पुन्हां त्या ुरुंच्या पायांखाली श्री शिवशंकराची पिंडी दिसली.

अशा प्रकारे नामदेवांनी विसोबांचे पाय वर्तुळाकार फिरवून बारा ठिकाणी ठेवले पण बाराही ठिकाणी जेव्हां त्यांनी विसोबांच्या पायांखाली श्री शिव-

शंकराची पिंडी पाहिली तेव्हां त्यांच्या डोक्यांमध्ये लख्ख प्रकाश पडला की, ज्याचे पाय प्रत्यक्ष ईश्वराला देखील शिरोधार्य आहेत तो मनुष्य निश्चितच असामान्य, अज्ञानी, पापी नसून थोर महात्मा असला पाहिजे अशी नामदेवांची पूर्ण खात्री झाली. स्वतःच्या कठोर वागणुकीबद्दल त्यांना अतिशय वाईट वाटून त्यांचे अंतःकरण दाटून आले. त्यांचे नेत्र अश्रूंनी भरून वाहू लागले, आणि लगेचच त्यांनी विसोबा खेचरांचे पाय आपले गुरुवर्य म्हणून घट्ट धरले. त्यांच्या पायावर डोके ठेवून आपल्या अश्रुंनी त्यांच्या चरणकमलावर अभिषेक केला. त्यावेळी नामदेवांना पश्चाताप झाला की, खरोखरच आपले खरे गुरु विसोबा खेचर असतांना आपण त्यांच्याविषयी गैर विचार मनांमध्ये आणले.

त्यावेळी विसोबा खेचर उठले आणि नामदेवांच्या मस्तकावर कृपाहस्त ठेवून त्याला आपल्या जवळ घेऊन ते म्हणाले, "बाळ! तुझ्या पायाखाली देव नाहीं काय? तू उभा आहेस तेवढी जागा तुला देवाशिवाय मोकळी वाटते काय? या त्रिभुवनांतील अणूरेणूत या चराचरांमध्ये तोच भरून राहिलेला आहे. या साऱ्या विश्वामध्ये परमेश्वर भरलेला आहे. आता तरी तुझी दृष्टी उघडली नां? आजपासून तू सर्वत्र परमेश्वर भरलेला आहे, त्याचे वास्तव्य सर्वत्र आहे हे पहायला लाग."

विसोबा खेचर या गुरुंच्या कृपेने नामदेव तात्काळ पूर्णत्व पावले. ते लगेचच कच्च्याचे पक्के देवभक्त बनले.

असेच एकदा नामदेव रस्त्याने चाललेले असतांना एक कुत्रा तोंडामध्ये पोळी घेऊन पळत जात असता त्यांनी पाहिला. लगेच ते एक तुपाची वाटी घेऊन त्या कुत्र्याच्या पाठीमागे पळू लागले, आणि म्हणू लागले, "देवा! त्या पोळ्यांना तूप लावू दे. तू थांब जरा. त्या पोळ्या तशा खाऊ नकोस. तुझे पोट दुखेल."

यावरून नामदेवांची ईश्वराविषयी असलेली आत्मियता, प्रेम, दृढ विश्वास, श्रद्धा, आसक्ती, चिकाटी इत्यादि सद्‌गुण दिसून येतात.

याकरिता परमेश्वराची भक्ती करीत असतांना निष्कलंक, निष्पाप, हृदयाची शुद्धता, चारित्र्य व निष्कपट ईत्यादी गुण अंगी असलेला गुरु असणे महत्त्वपूर्ण गोष्ट आहे.

गुरुवरील भक्ती जसजशी वाढत जाईल तसतशी शिष्याची अधिकाधिक प्रगती होत जाते. शिष्याकडून निर्हेतुक व निरहंकारपणे जर सेवा घडली तर ते त्याच्यावर तात्काळ गुरू प्रसन्न होतात व तो शिष्य गुरुकृपेला पात्र होतो.

जगांत सर्व काहीं मिळणे सुलभ आहे परंतु गुरुकृपारूपी भाग्य लाभणे हे मात्र अति दुर्लभ आहे ज्याची गुरुच्या ठिकाणी एकनिष्ठा असेल, ज्याची गुरुचा दास बनण्याची परिपूर्ण तयारी असेल त्यालाच गुरुकृपेचे महत्‌भाग्य लाभते.

लोखंड जसे परिसाच्या स्पर्शाने सुवर्ण बनते; त्याप्रमाणे सद्‌गुरुंच्या आशिर्वादाने साधक कृतार्थ होतो

त्याचप्रमाणे श्री साईबाबा शिरडीमध्ये वास्तव्य करीत होते तेव्हां श्री बाळाराम मानकर हे निस्सीम साईभक्त होते. श्री. मानकरांच्या बाबतीत घडलेली घटना अशी की,

श्री. बाळाराम मानकर हे आपल्या प्रिय आणि प्रेमळ पत्नीच्या विरहाने व्याकूळ होऊन तशा खिन्न परिस्थितीत आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून ते शिरडीला बाबांच्या आश्रयाला गेले. त्यांच्या आयुष्याला योग्य वळण देण्याच्या उद्देशाने बाबांनी त्यांना बारा रुपये काढून दिले आणि मच्छिंद्रगडावर जाण्यास सांगितले. श्री. मानकर प्रथम कबूल होईनात; परंतु बाबांनी आपला उद्देश त्यांना पटवून दिला, आणि योग साधना कशी करावी याचा धडा शिकविला. बाबांच्या आज्ञेप्रमाणे मानकर मच्छिंद्रगडावर जाऊन ध्यानधारणा करीत बसले. भक्तांना समाधि स्थितीत त्यांच्या गुरुंचे दर्शन घडते परंतु मानकरांना समाधी पूर्वीच्या जागृत स्थितीतच थोड्याच दिवसात श्री साईबाबांचे प्रत्यक्ष दर्शन घडले. मानकरांनी साईबाबांच्या भेटीच्यावेळी आपण मला या निर्जन एकांतस्थळी कां पाठविलेत म्हणून विचारले. त्या प्रश्नाला बाबांनी उत्तर दिले, "शिरडीला सर्वांच्या गोंधळात तुझे भडकलेले मन एकाग्रता पावणे कठीण होते, म्हणून तुला या एकांतस्थळी पाठविले. माझा साडेतीन हाताचा देह फक्त शिरडीतच वास्तव्य करीत आहे अशी तुझी भ्रामक कल्पना होती. पण आता प्रत्यक्ष बघ. मी सर्व विश्व व्यापून आहे. आता तू स्वतःशीच विचार कर, आणि मी सांगितल्याप्रमाणे योगसाधना कर." इतके सांगून श्री साईबाबा अदृश्य झाले.

मानकर बाबांच्या आज्ञेप्रमाणे मच्छिंद्रगडावर राहिले व त्यांचे समाधान झाल्यावर ते परत निघाले. पुण्याच्या स्टेशनवर तिकिटांना फार गर्दी असल्या-मुळे वाट पहात ते बाजूला उभे असतांना लंगोटी नेसलेला एक खेडूत त्यांच्या-जवळ आला आणि स्वतःसाठी आधीच काढलेले दादरचे तिकिट त्यांच्यापुढे करून म्हणाला, "आपणाला दादरला जावयाचे आहे ना? मग हे तिकिट घ्या काही आकस्मिक कारणाने माझा जाण्याचा बेत रहित झाला आहे."

मानकरांनी त्याच्याजवळचे तिकीट घेतले व भाडे देण्याकरिता ते हात पुढे करणार तोच तो मनुष्य गर्दीत मिसळून नाहीसा झाला. गाडी सुटेपर्यंत त्याला शोधण्याचा मानकरांनी खूप प्रयत्न केला. पण त्याचा पत्ता लागला नाही. मानकरांना हा दुसरा दृष्टांत झाला. त्यानंतर मानकर आपल्या मुलाबाळांना अखेरचे भेटून शिरडीला बाबांच्या जवळ कायमचे रहावयास गेले. तेथेच त्यांना बाबांच्या वरदहस्ताखाली जपजाप्य करीत असता आनंदाने मृत्यु आला आणि सद्‌गती मिळाली.

अशा प्रकारे प्रत्येकाने परमेश्वरावर श्रद्धा ठेवून भक्ती केल्यानंतर तो आपली कामना पूर्ण करतोच. म्हणून प्रत्येकाने साईभक्ती करीत असतांना साईबाबांच्या महान तत्वांचा अंगिकार केल्यानंतर आपणांस कसलेच दुःख, दैन्य, अपयश, संकटे येणार नाहीत कारण आपले कर्ता-करविता श्री साईबाबा आहेत.

आपले सद्‌गुरु साईबाबा हे आनंदाचे जनक आहेत. अनाथांचे नाथ आहेत. मोक्षाची इच्छा करणाऱ्या साधकरूपी चातकाने सद्‌गुरु करूणारूपी आकाशाकडे आर्त चित्ताने पाहिले की, सद्‌गुरु श्री साईबाबा कृपेचा मेघ भक्तावर वर्षाव करणारच यामध्ये तीळमात्र शंका नाही.

साईकृपेच्या ज्योतीकडे जावयाची अपेक्षा ठेवा. कळकळ व आत्मविश्वास अमाप असू द्या. नाउमेदीला थारा देऊ नका. त्यामुळे फलप्राप्ती होणार नाही. दुर्दम्य उत्साहाने साधनेचा मार्ग पत्करा, अर्धवट अस्थिर पाऊलांनी ध्येय साध्य होणार नाही.

श्री साईबाबांची कृपा सदैव भक्तांच्या पाठीशी राहावी हीच साईचरणी प्रार्थना! जय साईराम!!

# शिरडीची यात्रा कशी सफल करावी ?

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१।१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स.
बंड गार्डन रोड, पुणे – ४११ ००१.

**गोदावरीचे पवित्र स्नान । पुढे घेवोनिया समाधिदर्शन ।**
**करावे हे सच्चरित श्रवण । त्रिताप शमन होतील ॥९॥**

(श्री साईसच्चरित अ. ५२)

यावरून बाबा ह्यात असतांना व नंतर कित्येक वर्षे शिरडीस जाताना कोपरगाव येथे गोदावरी नदीत स्नान करून मगच पुढे टांग्याने शिरडीस जाण्याची पद्धत होती. परंतु आता निरनिराळ्या दिशांकडून एस. टी. बसेसची सोय झाली आहे आणि जरी कोपरगावकडून यात्रेकरूंचे येणे झाले तरी आता बसमधून उंच पुलावरून प्रवास होत असल्याने पूर्वी सारखी टांग्यातून होणारी गोदावरी नदीची जवळीक साधली जात नाहीं. त्यामुळे आता ही पद्धत बंदच पडली आहे.

तसेच शिरडीत बाबांचे दर्शन कसे घ्यावे याबद्दल कै. नानासाहेब चांदोरकर कै. रा. ब. मोरेश्वर प्रधान वगैरे श्रेष्ठ भक्तांनी चर्चा करून एक शास्त्रशुद्ध पद्धत संमत केली होती ती अशी :–

(१) शिरडीत आल्यावर गुरुस्थान येथे कडुनिंबाच्या झाडाखालील बाबांच्या गुरुंच्या समाधीचे दर्शन घ्यावे व प्रदक्षिणा घालावी.

(२) नंतर द्वारकामाईत जाऊन बाबांच्या साक्षात् रंगविलेल्या प्रतिमेचे व अखंड प्रज्वलित धुनीचे दर्शन घ्यावे.

(३) चावडीत जाऊन बाबांची झोपण्याची खोली पहावी व गादीवर ठेवलेल्या पादुकांना नमस्कार करावा.

(४) बुट्टी वाड्यातील श्री बाबांच्या समाधीचे (आणि सुंदर भव्य मूर्तीचे) दर्शन घ्यावे.

(५) शेवटी लेंडीबागेत जावे व तेथील नंदादीप पाहून बाबांच्या बसण्याने पवित्र झालेल्या निंबवृक्षाला व पिंपळवृक्षाला प्रदक्षिणा घालावी.

असा हा पंचस्थानांना भेट देण्याचा क्रम जाणते भक्त अजूनही पाळत असत. परंतु त्यांनाही त्यात आता बदल करावा लागत आहे. भक्तांची अतोनात गर्दी समाधि–मंदिराकडे वळल्याने आधी तेथे नंबर लावण्याची भक्तांना काळजी असते. भक्तांना भेटीसाठी समाधि–मंदिराला पहिला क्रम द्यावा लागतो.

शिरडी क्षेत्र गेल्या दहा वर्षांत खूप बदलले आहे. बाबांची कीर्ती सर्व जगभर दुमदुमली आहे आणि शिरडीस त्यांच्या समाधीच्या दर्शनाला मुंग्या-सारख्या चोहीकडून रांगा लागलेल्या असतात. आरतीसाठी व दर्शनासाठी समाधी पुढील मोठे सभागृह आणि त्यापुढील उघडे पटांगणही अपुरे पडू लागले आहे. राहण्यासाठी संस्थानच्या विस्तीर्ण खोल्यांच्या व दालनांच्या अनेक भव्य इमारती व खासगी पंचतारांकित हॉटेल्स असूनही भक्तांना बाहेर उघड्यावर झोपण्याची पाळी येते. भोजनासाठी एकावेळेस एक हजार माणसे बसतील एवढे भव्य व आधुनिक सोयीयुक्त भोजनगृह संस्थानने बांधूनही भोजनासाठी (खास करून उत्सवांच्या वेळी) भक्तांना तासन्तास रांगेत ताटकळत उभे राहण्याची पाळी येते.

अशा प्रकारे सर्वच बदललेल्या परिस्थितीत शिरडीत गेल्या नंतर भक्तांना जर शिरडीच्या यात्रेचे खरेखुरे समाधान हवे असेल तर त्यांनी पूर्वी पाळत असलेले विधिनिषेध व पद्धती बाजूला ठेवून नवीन परिस्थितीला भावनेच्या किंवा विकाराच्या बळी न पडता तर्कशुद्ध विचारांनी तोंड दिले पाहिजे. त्याच दृष्टीने आता शिरडीची यात्रा कशी सफल करावी याचा विचार करू या.

**घरून निघताना :**

प्रथम शिरडीस जाण्यासाठी घरून निघताना संसाराच्या सर्व गोष्टी विसरून आणि कौटुंबिक व नोकरी–धंद्याच्या सगळ्या चिंता बाजूला सारून निघावे. आता दृष्टी फक्त शिरडीकडे आणि मन बाबांकडे लागलेले असावे. बसचे किंवा रेल्वेचे शक्यतो आधीच आरक्षण केलेले असावे म्हणजे प्रवासात उगाच दगदग होऊन मनाची शांती बिघडणार नाही. बरोबर पैसे लागतील तेवढेच घ्यावे. तसेच स्त्रियांनीही दागिने मोजकेच घालावे. एकतर वाटेत किंवा शिरडीत

त्याबद्दल सारखी काळजी आणि चोरीला गेले तर शिरडीहून परततांना होणाऱ्या आनंदात व्यत्यय. प्रवासात जागा नीट न मिळाल्यास कोणाशी भांडण-तंटा करू नये व मिळेल त्यात समाधान मानावे. बाबांच्या शिकवणीची आठवण ठेवावी.

कोणीही बोल बोलो शंभर । स्वये नेदी कटु उत्तर ।
धरिता सहिष्णुता निरंतर । सुख अपार लाधेल ॥
अ. १९ ओ. १४४ ॥

आणि सारखे बाबांच्या चिंतनात व नामस्मरणात किंवा बाबांच्याच गोष्टी करण्यात वेळ घालवावा :–

शिरडीला मला जायाचे जायाचे । घर ते माझ्या रायाचे ॥

**शिरडीस पोहोचल्यावर :**

शिरडी जवळ आल्यावर जर समाधि मंदिराचा कळस व निशाणे दिसली तर त्यांना बाबांची जय बोलून वंदन करावे. संस्थानच्या आवारात शिरल्यावर रात्री मुक्काम करण्याची इच्छा असल्यास निवास-स्थान कार्यालयाकडे जाऊन आधी खोलीचा बंदोबस्त पहावा. मग हातपाय धुवून समाधि मंदिरात जाऊन बाबांचे दर्शन घ्यावे. तेथे गर्दी असल्यास दुरूनच मूर्तिचे दर्शन मिळाले तरी त्यात समाधान मानावे. ही पहिलीच घाईची 'धूळभेट' आहे. बाबांना 'मी आलो' हे सांगणे आहे. नंतर स्नान वगैरे झाल्यावर शांतपणे दर्शन पूजा होईलच.

**अभिषेक किंवा फुलहार नैवेद्य :**

अभिषेकाच्या तिकीटासाठी आजकाल (विशेष करून उत्सवात) मोठी रांग असते. पहाटे ३ वाजता रांगेत जागा धरली तरी तिकीट मिळत नाही. तरी वाईट वाटून घेऊ नये. बाबांची इच्छा म्हणून गप्प बसावे, व फक्त पुजाऱ्यामार्फत फुलहार व नैवेद्य चढवावा. मात्र रांग डावलून किंवा काळ्या बाजारचे तिकीट खरीद करू नये. अशा प्रकारे मिळविलेली अभिषेकाची संधी कितपत फळेल?

अभिषेकासाठी किंवा नुसत्या पूजेसाठी पूजेचे ताट, मूर्तीला हार व समाधी-ला वस्त्र वगैरे खरेदी करतांना व्यवहारात चोख असावे. दुकानदाराकडून फस-

विले जाऊ नये. स्वतः बाबा देखील अन्नदानासाठी (हंडी साठी) वाण्याकडून धान्य व मसाले खरेदी करताना दरदाम करून करत असत. तसेच मूर्तीचा हार किंवा समाधीचे वस्त्र आपल्या आर्थिक परिस्थितीला परवडेल तसेच घ्यावे. भारी किंमतीचे असलेच पाहिजे असे नाहीं. बाबा भावाचे भुकेले आहेत आणि साधे फुलपानही गोड मानून घेतात :

**'भावे अर्पिता फूल पान । अति प्रेमे करील सेवन '॥**

॥ अ. १६ ओ. ११ ॥

**आरती :**

बाबांच्या आरतीला (विशेषेकरून माध्यान्हाच्या आरतीला) मोठी गर्दी असते. तिचे तसे महत्त्वही आहे. याचवेळी बाबांचे स्नान होऊन भक्तांचे पूजा-विधी व अभिषेक आटोपलेले असतात. बाबांची मूर्ती आणि समाधीही रंगी-बेरंगी फुलहारांनी सजलेली असते. मूर्तीला मनोहर व भरजरी वस्त्र पांघरलेले असते व बाबांच्या मस्तकावर सोन्याचा मुकुट विराजमान असतो. अशा दर्शनाचे भाग्य शिरडीस येऊन कोणत्या भक्ताला सोडायला आवडेल? म्हणून प्रत्येकाची शक्य तो पहिल्या रांगेत अगदी समाधीच्या चबुतऱ्याजवळ जागा मिळविण्याची धडपड असते. परंतु सर्वांनाच ते शक्य होत नाहीं. तेव्हां वयपरत्वे किंवा अशक्त-पणाने ज्यांना हे जमत नसेल त्यांनी या भानगडीत पडून स्वतःला इजा करून घेण्यापेक्षा व मनाची शांती घालविण्यापेक्षा दुरूनच मोकळ्या पटांगणातूनही भक्तिभावपूर्वक आरती ऐकली व म्हटली तरी चालेल. भक्त चोखामेळा महार जातीचा असल्याने त्याला आपल्या दर्शनासाठी देवळात येता येत नव्हते म्हणून विठोबा स्वतःच त्याचेकडे देवळाच्या बाहेर भीमेच्या पलिकडेही आलेच होते नां?

आरतीसाठी गर्दीत उभे राहताना लक्षात ठेवण्याची पहिली गोष्ट म्हणजे तेथे पैसे आरतीच्या ताटात किंवा पेटीत टाकण्या इतकेच बरोबर घ्यावे. आरतीच्यावेळी आपले दोन्ही हात वर जोडलेले असतात किंवा टाळ्या वाजवित असलेले असतात आणि लक्ष बाबांच्या चेहऱ्याकडे व आरतीतील शब्दांकडे लागलेले असते. अशावेळी पॉकेटमाराला सोपे फावते. दुसरे म्हणजे 'हरे राम हरे राम, राम राम हरे हरे' म्हणतांना स्वतःभोवती एक प्रदक्षिणा घालण्याची प्रथा! अंगाला अंग लागणाऱ्या भरगर्दीत असे करणे म्हणजे आधी छान जमलेले

स्थैर्य घालविणे होय. प्रदक्षिणा संपल्यावर बाबांचा चेहरा नीट दिसत नाहीं म्हणून पुन्हा चुळबूळ सुरू होते. म्हणून भक्तांनी अशी प्रदक्षिणा प्रत्यक्ष न घालता मनानेच घातली तर किती बरे होईल? तिसरी गोष्ट म्हणजे मंत्र-पुष्पांजली करिता वाटल्या जाणाऱ्या फुलांसाठी व आरतीचे ताट चोपदार फिरवित असताना ती घेण्याची व त्यात पैसे टाकण्याची भक्तांची व्यर्थ धडपड! मंत्रपुष्पांजलीसाठी फुले सर्वांना वाटणे शक्य नसते. तेवढा वेळही नसतो. भक्तांनी आपली जागा न सोडता वाटयास आले तरच फूल घ्यावयाचे नाहीं-तर मनानेच पुष्पांजली अर्पण करावयाची असे ठरविले तर किती शांतता नांदेल? त्याच सुमारास मंत्रपुष्पांजलीचे श्लोक म्हटले जात असतात. ते शांत-पणे ऐकले किंवा म्हटले तर जास्त श्रेयस्कर नाही का होणार? तसेच बाबांच्या आरतीच्या ताटाचे, केवढी धक्काबुक्की! ताटात टाकलेल्या नोटा व नाणी तर पडण्याची भिती असतेच पण एकदा तर पेटलेल्या निरांजनासह ताटच पडता पडता राहिलेले मी पाहिले आहे. खरे म्हणजे आरतीच्या ज्वाळेवरुन हात फिर-वून ती आपल्या अंगावर घेणे ही फक्त रूढीच आहे. खरी शास्त्रोक्त व अर्थ-पूर्ण पद्धत म्हणजे त्या पवित्र दीपज्वालेकडे एकाग्रतेने पाहून तिला मनाने हृदयात साठविणे हीच होय, व हे दुरूनही करता येते. पैसे टाकले तरी ते संस्थानच्या पेटीतच जाणार. मग ते ताटात टाकण्यासाठी त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या 'अनंता तुला ते कसे रे स्मरावे' 'ऐसा येई बा । साई दिगंबरा' या सारख्या भावपूर्ण प्रार्थनांकडे दुर्लक्ष करून धक्काबुक्की करून गोंधळ माजविण्यात काय अर्थ आहे? खरे पाहिले तर आरतीची ओवाळणी म्हणजे त्या देवतेची 'आळवणी' (प्रार्थना) होय आणि ती आर्त होऊन एकाग्रतेने केली तरच ती सफल होईल नाहीं का?

**गुरुस्थान :**

शिरडीस गेल्यावर बाबांच्या गुरुस्थानाचे दर्शन घेतल्याशिवाय परतणे म्हणजे बाबांचा अपमानच करणे होय. गुरुस्थानात शिरल्यावर डावीकडे कोपऱ्यात एक लेखशिला आहे. ज्यावर मराठीत "हे आपल्या गुरुरायाचे स्थान असे साईबाबा म्हणत" असे लिहिलेले आहे आणि त्या मागे अलीकडे बसवि-लेली बाबांची एक मूर्ती आहे. खेदाची गोष्ट म्हणजे नवीन येणाऱ्या भक्तांना या गुरुस्थानाचे महत्त्व माहीत नसल्यामुळे मागे असलेल्या बाबांच्या मूर्तीला स्पर्श करण्यासाठी या गुरुस्थानाच्या लेखशिलेवर सरळ गुडघे टेकून पुढे वाकलेले कितीतरी भक्त दृष्टीस पडतात. मध्यभागी चांदीच्या देव्हाऱ्यात शंकराची पिंडी

व बाबांची चांदीची फरेम मधील तसबीर आहे, व उजव्या बाजूस प्रसिद्ध निंबवृक्ष व त्याखाली बाबांच्या पादुका आहेत. या सर्वांचे दर्शन घेऊन भक्तांनी गुरुस्थानाला व निंबवृक्षाला कमीत कमी तीन प्रदक्षिणा घालाव्यात. तसेच ऊदही जाळावा. बाबांनी किती हेतूपूर्वक आपल्या गुरुच्या समाधीसमोर दर गुरुवारी (हिंदूंच्या दत्तात्रेयाच्या पवित्र् वारी) व शुक्रवारी (मुसलमानांच्या पवित्र वारी) ऊद जाळण्याची आज्ञा केली आहे.

### द्वारकामाई :

द्वारकामाईतील मुख्य आकर्षण म्हणजे बाबांचे चितारलेले हुबेहूब चित्र. कोठूनही पहा बाबा आपल्याकडेच पाहत असल्याचा भास होतो. येथे सतत पेटणारी धुनीतर आहेच व खांबाजवळ एका पात्रात उदीही आहे. येथूनच भक्त बरोबर नेण्यासाठी उदी काढून घेतात. परंतु तसे करतांना भांड्यात किती उदी शिल्लक आहे हे पाहून, इतर भक्तांचा विचार करून, जास्त लोभ न करताच घेतलेली बरी.

द्वारकामाईत पाण्याचा माठ आहे – बाबा देहधारी असतांना होता तसा! सर्व भक्तांना पटेल की नाहीं कोणास ठाऊक. परंतु मला वाटते प्रत्येक भक्ताने जशी उदी घेतो त्याप्रमाणे या पाण्याचाही एक घोट घ्यावा. तसे पाणी स्वच्छ असते व बहुधा उष्टेही नसते. भिक्षेहून आणलेल्या व कुंडीत ठेवलेल्या अन्नात कावळ्याकुत्र्यांनी तोंड घातले तरी बाबांना चालत असे, कारण सर्व प्राणी-मात्रात ते स्वत:लाच पाहत होते व तशी त्यांची शिकवणही होती. आपली अध्यात्मात अजून तेवढी मजल नाहीं. परंतु जातीभेद न मानता या पाण्याचा एक घोट जरी बाबांच्या द्वारकामाईत आपण घेतला तर त्यांना निश्चित आनंद होईल.

### अब्दुलबाबांची झोपडी :

द्वारकामाईकडून चावडीकडे जातांना उजव्या हाताला अब्दुलबाबांची झोपडी आहे. बऱ्याच भक्तांना हे माहीत नाहीं. ज्या प्रमाणे म्हाळसापती साईबाबांचा एक निस्सीम भक्त होता त्याप्रमाणे अब्दुल्ला हा त्यांचा एक निस्सीम मुसलमान भक्त होता. आपल्या बायकोला व मुलाला सोडून तो बाबांजवळ त्यांचे हयातीत ९–१० वर्षे राहिला होता व नंतरही शिरडी सोडून परत गेला नव्हता. बाबांची

सर्व सेवा – रस्ते झाडण्याचेही काम तो खुषीने करत असे. रात्री न झोपता सारखा कुराण वाचत असे. अशा बाबांच्या भक्ताचे तो मुसलमान म्हणून आदर न करणे म्हणजे बाबांची शिकवणच विसरणे होय.

**चावडी :**

येथे बाबा एक दिवसा आड रात्री फक्त झोपत असत. सकाळी काकड–आरतीनंतर परत द्वारकामाईत जात असत. म्हणूनच की काय स्त्रियांना या बालब्रम्हचारी बाबांच्या झोपण्याच्या खोलीत जाण्याचा मज्जाव आहे. चावडीत गेल्यावर मला श्रीसाईसच्चरित्रातील २० व्या अध्यायातील अमीर शक्कराची आठवण येते. बाबांची आज्ञा मोडून तो कोपरगावला पळून गेला होता. तेथून बाबांनी युक्तीने त्याला परत आणले. एवढेच नव्हे तर या आज्ञाभंगी भक्ताला नंतर सर्पदंशा पासूनही वाचविले. किती दयाळू व भक्तांसाठी जीव टाकणारे बाबा! याची आठवण होऊन, चावडीस गेल्यावर प्रत्येकवेळी मी बाबांच्या पादुकांवर मस्तक ठेवून प्रार्थना करतो की, "हे करुणाब्धे । श्री प्रभो साईनाथ" माझेही अपराध असेच पोटात घालून माझ्यावर अनुग्रह करत रहा!"

**लेंडीबाग :**

या बागेच्या प्रवेशद्वाराचे आधीच उजव्या हाताला अब्दुलबाबा, नानावल्ली, तात्या कोते पाटील वगैरेंच्या समाध्या लागतात. त्यांना आदराने नमस्कार करावा. पुढे बागेत सतत पेटणारा नंदादीप आहे व बाबांच्या बसण्याने पवित्र झालेले निंबवृक्ष व पिंपळवृक्षही आहेत. त्यांना प्रदक्षिणा घालून त्यांचे समोरच पूर्वस औदुंबराखाली अलिकडेच स्थापन केलेल्या दत्ताचे दर्शन घ्यावे. त्याबरोबरच मागेच असलेल्या मेघा व श्यामसुंदर (बाबांचा घोडा) यांच्या समाध्यांची पण आठवण ठेवावी.

**भोजनगृह :**

संस्थानचे हे भव्य भोजनगृह अप्रतिम आहे. बसण्याची व ताटवाट्यांची तर उत्तम सोय आहेच परंतु जेवणही गरमागरम वाढण्याची उपकरणेही उपलब्ध आहेत. परंतु खेदाची गोष्ट की रांग लावण्याची संस्थानने अति उत्तम सोय केलेली असून भक्तलोक (खास करून उत्सवांचे वेळी) येनकेन प्रकारेन

रांगा डावलण्याचा प्रयत्न करतात व कित्येकदा तर संस्थानने मोठ्या खर्चाने उभारलेली लाकडी कुंपणेही तोडून भोजनगृहात आधी शिरण्यासाठी दंगा करतात. अशावेळी लहान मुले, स्त्रिया व वृद्ध चिरडले जातात. बाबांच्या पवित्र स्थानी यात्रेला येऊन असले अशोभनीय व अनैतिक प्रकार करणारे भक्त पाहिले म्हणजे वाईट वाटते. बाबांच्या संस्थानचे आर्थिक नुकसान करून इतर शांत किंवा अशक्त भक्तांवर अन्याय करून आपलेच पोट आधी भरणाऱ्या या भक्तांनी संस्थानचे पेटीत कितीही रुपये टाकले तरी शिरडीची यात्रा त्यांना कितपत फलद्रुप होईल? दुसरीकडे सोय असून व ऐपत असूनही काही भक्त संस्थानचे भोजनगृहातच रांगेत उभे राहूनही जेवण घेण्याचा प्रयत्न करतात तो बाबांचा प्रसाद खावयाचा म्हणून. अशा भक्तांची मात्र अशावेळी पंचाईत होते. असो.

जी गोष्ट भोजनगृहाची तीच चहाच्या ठिकाणची. तेथेही समूहाने (ग्रूपने) येणारे भक्त रांगेत एकाच भक्ताला पाठवून एकावेळी १५–२० कप घेतात. मग त्याच रांगेत एकच कप स्वतःसाठी घेणाऱ्याचे हाल काय विचारावे? त्याला ही मग रांगेत पुढे असणाऱ्या ओळखीच्या गृहस्थाला आपल्यासाठी एक कप जादा घेण्यास सांगून नियमबाह्य वागण्याचा मोह झाला तर काय आश्चर्य?

परतणे :]

शेवटी शिरडी सोडताना कितीही घाई असली तरी समाधि–मंदिरात बाबांचे दर्शन घेऊन (गर्दी असल्यास अगदी दुरून देखील) त्यांची आज्ञा मागावी व परत लवकर बोलावण्यास प्रार्थना करावी. नंतर बसने किंवा गाडीने निघताना समाधि–मंदिराच्या कळसाला व निशाणांना वंदन करून व बाबांची जय बोलून परतीचा प्रवास सुरू करावा. परतीच्या प्रवासाला मन प्रफुल्लित ठेवायला प्रयत्न करावा लागत नाहीं. शिरडीतील वास्तव्यानेच व बाबांच्या दर्शनाने मन इतके आनंदलेले असते की घरी पोहोचे पर्यंत व नंतर एकदोन दिवस तरी आपण हवेत तरंगत असतो.

**॥ अनंतकोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगिराज परब्रम्ह**
**श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय ॥**

◆ ◆ ◆

# सद्गुरु म्हणजे ज्ञानदीप

—श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार
किल्ला नांदेड.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः ॥

० सद्गुरु सच्चिदानंद साईबाबांचे पुष्कळसे भक्त बाबांना साधकाचे सिद्ध झालेले मानीत नसून प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार मानतात. बाबा स्वतः मात्र काहींही बोलतांना अगर उपदेश करताना हा अधिकार आपल्याकडे घेत नसत. ते स्वतः असे म्हणत, की, माझ्या गुरुची पूर्ण कृपा आहे. मी केवळ निमित्त मात्र आहे. गुरुच्याच कृपेने आणि आशीर्वादाने मी भक्ताची संकटापासून मुक्तता करतो आणि त्यांना सन्मार्गाची दिशा दाखवून देतो आणि परमेश्वराच्या अस्तित्वाची ओळख करून देतो. मी स्वतः काहींही नसून त्या दयाघन परमेश्वराचा सेवक बंदा आहे.

पैशाने सुख मिळते ह्या समजूतीने मनुष्य नेहमी पैशाच्या मागे लागतो. स्त्री हे सुखसाधन समजून तो सुंदर स्त्रियांच्या मागे फिरतो. लौकिक व प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून तो परिश्रम करीत राहतो. कनक, कामिनी आणि किर्ती ही मिळविण्यासाठी त्याचे जीवाचे रान होते व ती न मिळाली तर तो दुःखी होतो. परंतु नवल असे की त्याची प्राप्ती झाली असली तरीही तो दुःखीच राहतो. जवळ गडगंज संपत्ती असलेल्या कोट्याधिश, शेकडो स्त्रियांचा जनानखाना बाळगणारा उमराव, अथवा त्रिखंड किर्ती मिळालेला एखादा सेनापती याचे अंतरंग पाहता आले तर तो हव्यास आणि असमाधान यांनी भरलेले आहे असेच आढळून येईल. मनुष्याचे मन नेहमीच असंतुष्ट असते त्याला सारखे काहीं ना काहीं हवे असते, व ते मिळत नाहीं म्हणून तो दुःखी राहातो. ह्या स्थितीत सांसारिक दुःखे देहाचे आजार व मनाच्या यातना यांनी माणूस अत्यंत गांजला असताना त्याच्या मनात विचार येतो की मनास सुख, शांती, समाधान लाभेल असे काहीं जगात आहे काय, तेव्हां त्यास एखाद्या साधू-संताची भेट घ्यावीशी वाटते व त्याचे चार उपदेशाचे शब्द ऐकून त्याचे मन स्थिरावते. त्याच्या आत्म्यास समाधान लाभते व तो त्या संतास सद्गुरु मानून शरण

जातो व गुरु उपदेश घेऊन सन्मार्गी लागतो, व शेवट पर्यंत त्यांच्या चरणी लीन राहून मोक्ष प्राप्तीही करून घेतो.

साईबाबांनी एक गोष्ट सांगून सद्‌गुरुचे महत्त्व पटवून दिले आहे. ते म्हणाले एकदा आम्ही चौघेजण धर्म ग्रंथाचे अध्ययन करून ब्रम्हज्ञानाचा शोध लावण्या करिता घनदाट अशा घोर अरण्यात निघालो. वाटेत एक वंजारी भेटला. अरण्याची माहिती करून देणारा उत्तम वाटाड्या बरोबर घेतल्या शिवाय तुम्हांला आपला पल्ला गाठता येणार नाहीं, असे आपुलकीच्या भावनेने सांगून त्याने आमचा अतिथी सत्कार केला, आम्ही त्याची विनंती धुडकावून तसेच जंगलात शिरलो. बराच वेळ भटकल्यावर पुनः त्याच जागेवर आलो तो वंजारी तेथेच होता. तो पुनः म्हणाला "असा हट्ट धरू नका वाटाड्या शिवाय तुम्हांला मार्ग मिळणार नाहीं. शिवाय भुकेल्या पोटी कोणतेही कार्य सिद्धीस जाणार नाहीं. ईश्वरी योगायोगानेच आपल्या भेटी होतात. पुढे आलेल्या अन्नाला कधीही दूर सारू नये अन्नाने भरलेले ताट पुढे येणे हा फार मोठा शुभ योग आहे. आज माझ्याकडे भोजन करा आणि मग पुढे जा."

माझ्या तिघा मित्राना हा सल्ला पटला नाहीं ते पुढे निघून गेले. माझा जीव भुकेने आणि तहानेने व्याकूळ झाला होता. तो क्षुद्र आहे हे मनात न आणता मी तेथेच राहिलो, त्याने वाढलेल्या चटणी भाकरीचा स्वीकार केला आणि त्याच क्षणी माझे अंतर्मन दिव्य ज्ञानाने उज्वलित झालेले मला दिसून आले. माझी गुरु माऊली अकस्मात माझ्या पुढे उभी राहिली आणि सर्व हकीकत ऐकून मला म्हणाली "माझ्या बरोबर चल मी तुला मार्ग दाखवितो पण माझ्यावर अंध विश्वास ठेऊन वागले पाहिजे." मोठ्या आनंदाने मी माझ्या गुरुच्या बरोबर निघालो. घनदाट अरण्यात एका खोल विहीरात माझे पाय दोरीने घट्ट बांधून माझ्या गुरुने मला उलटे टांगून ठेवले चार–पाच तासांनी माझे गुरुजी परत आले आणि माझी सुटका करून कसे काय वाटले म्हणून विचारले. मी उत्तर दिले की मी आनंद सागरात पोहत होतो. माझ्या गुरुजींना धन्यता वाटली व त्या वेळेपासून ते माझ्यावर मुलाप्रमाणे प्रेम करू लागले. गुरुकृपेने माझी ब्रम्हानंदी समाधी लागू लागली.

ह्या गोष्टीरूपाने साईबाबांनी सांगितलेली हकीकत किती मौलिक आहे. त्यात "अन्न परब्रम्ह" "भूत दया" "समदृष्टी" व सद्‌गुरु वर पूर्ण श्रद्धा व विश्वास व सद्‌गुरुची आवश्यकता ह्या साऱ्या अमृततुल्य गोष्टीचा उपदेश आहे.

गोष्ट साधी पण आध्यात्म्य प्राप्तीचे मार्गदर्शन साईबाबांनी किती सोप्या भाषेत समजावले आहे.

चांगदेवाने मृत्युवर विजय मिळविला व चौदाशे वर्षे पर्यंत तो जीवंत राहिला तो म्हणत असे की मला ह्या मृत्यु लोकात माझ्या पेक्षा श्रेष्ठ कोणी दिसेना त्याचवेळी त्याला संत ज्ञानेश्वरांची किर्ती समजली व अलकावतीस जाऊन त्यांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. तत्पूर्वी त्यांना पत्र पाठवावे म्हणून त्याने कागद लेखणी घेतली व विचार करीत बसला की चिरंजीव लिहू तर मला त्यांच्याकडून उपदेश घ्यावयाचा आहे, तीर्थरूप लिहू तर वयाने माझ्यापेक्षा ज्ञानेश्वर फारच लहान आहेत म्हणून तसाच कोरा कागद आपल्या शिष्याकडे दिला शिष्य आकाश मार्गाने क्षणात येऊन पोहचला. तो काही म्हणण्या अगोदरच संत ज्ञानेश्वर माऊली म्हणाली की चौदाशे वर्षे लोटली तरी चांगदेव कोराच राहिला. अमृत वृक्षास फळ न येताच तो वाढत गेला अथवा जेथे पाणी नाहीं तेथे मोठा तलाव बांधून ठेवला त्याचा काय उपयोग होणार. म्हणून ज्ञानेश्वर माऊलीने त्याच कोऱ्या कागदावर उत्तर लिहून पाठविले की सच्चिदानंद सर्वभूती समान वास करतो ह्या सृष्टीत कोणी वडील अथवा धाकटा नाहीं. जितक्या काही वस्तू ब्रम्हांडी दिसतात तितक्या सर्व आपल्या देहात असतात परंतु अज्ञानामुळे ते आपल्याला दिसत नाहीं. सर्वभूती आत्मा परमात्मारूपाने अस्तित्वात असतो. पत्र वाचून चांगदेवास आनंद व समाधान वाटले व अशा ज्ञानाच्या सागरास भेटण्याची त्यास तीव्र इच्छा झाली तो वाघावर बसून सापाचा चाबूक हाती घेऊन शिष्य मंडळी बरोबर निघाला त्या वेळी ज्ञानेश्वर भिंतीवर बसले होते त्यांनी भिंतीस चांगदेवाच्या स्वागतासाठी पुढे जाण्यास आज्ञा दिली. भिंतीवर बसून ज्ञानेश्वर माऊली येत असलेले पाहून चांगदेव वाघाच्या पाठीवरून खाली उतरला व लोटांगण घालीत ज्ञानेश्वर माऊली जवळ आला, व शरण गेला. ज्ञानेश्वराने त्यास अनुग्रह दिला व मोक्ष पदास पोहचविले.

एकदा निवृत्तीनाथ, सोपान, नामदेव, सावतामाळी मुक्ताबाई वगैरे सर्व वैष्णव जन गोऱ्या कुंभाराच्या विनंतीस मान देऊन त्याच्या घरी गेले. ज्ञानदेवांनी थट्टेने गोऱ्या कुंभारास विचारले की आम्हां सर्वांच्या घरात पक्के कोणते व कच्चे कोणते ते सांगावे. त्यावर गोरा कुंभार थापटी घेऊन उठला व सर्वांच्या डोक्यास वाजवित सुटला, जेव्हां नामदेवाची पाळी आली तेव्हां नामदेव म्हणाले

ाझ्या डोक्यास मारू नका. गोरा कुंभार म्हणाला की हे भांडे कच्चे दिसते. व्हां सर्व संत मंडळी हसली.

नामदेवाचा अपमान झाला म्हणून तो तडक पांडुरंगाकडे फिर्याद घेऊन ाला तेव्हां पंढरीनाथही हसले. पांडूरंगाने नामदेवास सद्गुरुचा उपदेश घेण्याचीं ाज्ञा दिली ते म्हणाले की ज्याला सद्गुरु नसतो त्याला जगात कच्चेच म्हण- ात. त्यावर नामदेव म्हणाला की देवाधिदेव माझ्या हृदयात असतांना मला ाद्गुरु कशास हवा. तो तरी तुझीच भक्ती करण्यास सांगील. त्यावर पंढरीनाथ ामदेवास म्हणाले की मी स्वत: राम अवतारी असतांना वशिष्ठास शरण ाऊन आध्यात्म्य ज्ञान शिकलो. कृष्ण अवतारी मी सांदिपनीस सद्गुरु करुन ात्मज्ञान प्राप्त केले. तेव्हां नामदेवाने पांडुरंगाचे चरण धरले व देवाची आज्ञा शेरसावंद्य मानून विसोबा खेचरास हुडकित मल्लीकार्जूनाच्या देवळात आला ेव्हां विसोबा महादेवाच्या पिंडीवर पाय ठेऊन निद्रीत अवस्थेत दिसले. नामदेव नेराश झाला तो विसोबा खेचराजवळ येऊन म्हणाला की तुमचे पाय शिवाच्या मस्तकावर पडलेत हेच तुमचे ब्रम्हज्ञान आहे काय? त्यावर विसोबा नामास म्हणाला की चुकीने माझे पाय शिवाच्या पिंडीवर पडले आहेत. माझ्यात उठ- ण्याची सुद्धा शक्ती नाहीं तू विष्णूभक्त भेटलास म्हणून बरे झाले आता माझे पाय उचलून थोडे बाजूस ठेव, नामदेवाने विसोबाचे पाय उचलून बाजूस ठेवले तो तेथेही शिवाची पिंडी दिसू लागली. त्याने अनेक ठिकाणी पाय सरकून पाहिले तो त्याला प्रत्येक ठिकाणी शिवलिंग दिसू लागले. तिळमात्र ही जागा त्याला रिकामी दिसेना तेव्हां तो आश्चर्यचकित झाला. त्याला देवळातील सर्व वस्तूंचा आकार शिवमय दिसत होता जे लोक स्त्री, पुरुष तेथे दर्शनास येत होते तेही त्यास शंकर–पार्वती दिसत होते. सर्व जगच शिवमय झाले होते तेव्हां विसोबा म्हणाले की मला कष्ट होत आहेत कोठेतरी धरणीवर माझे पाय टेकव. तेव्हां नामदेव म्हणाला तिळमात्रही जागा शिल्लक नाहीं जिकडे तिकडे कैलासनाथ दिसतात म्हणून मी तुमचे चरण धरले व तुम्हांस सद्गुरु मानून शरण आलो. मग विसोबाने नामदेवास उपदेश केला ते म्हणाले की शिवास पाच मुख व तीन नेत्र आहेत दहा हात आहेत त्याचे चरण सप्त पाताळापर्यंत आहेत ज्याचा महिमा वर्णन करण्यास शास्त्र, वेद, पुराणे सर्व असमर्थ आहेत. तो विश्वरूपी सर्व ठिकाणी आहे अशा शिवाचे चिंतन माझ्या हृदयात नेहमी चालू असते. हे ज्ञान मला सद्गुरु ज्ञानेश्वर माऊलीने दिले. हे ऐकून नामदेवाने विसोबाचे चरण धरले व म्हणाला की तुम्हीच माझे सद्गुरु आहात तुमचे चरण

माझ्या डोक्यास मारू नका. गोरा कुंभार म्हणाला की हे भांडे कच्चे दिसते. तेव्हां सर्व संत मंडळी हसली.

नामदेवाचा अपमान झाला म्हणून तो तडक पांडुरंगाकडे फिर्याद घेऊन आला तेव्हां पंढरीनाथही हसले. पांडूरंगाने नामदेवास सद्गुरुचा उपदेश घेण्याची आज्ञा दिली ते म्हणाले की ज्याला सद्गुरु नसतो त्याला जगात कच्चेच म्हण-तात. त्यावर नामदेव म्हणाला की देवाधिदेव माझ्या हृदयात असतांना मला सद्गुरु कशास हवा. तो तरी तुझीच भक्ती करण्यास सांगील. त्यावर पंढरीनाथ नामदेवास म्हणाले की मी स्वतः राम अवतारी असतांना वशिष्ठास शरण जाऊन आध्यात्म्य ज्ञान शिकलो. कृष्ण अवतारी मी सांदिपनीस सद्गुरु करून आत्मज्ञान प्राप्त केले. तेव्हां नामदेवाने पांडुरंगाचे चरण धरले व देवाची आज्ञा शिरसावंद्य मानून विसोबा खेचरास हुडकित मल्लीकार्जूनाच्या देवळात आला तेव्हां विसोबा महादेवाच्या पिंडीवर पाय ठेऊन निद्रीत अवस्थेत दिसले. नामदेव निराश झाला तो विसोबा खेचराजवळ येऊन म्हणाला की तुमचे पाय शिवाच्या मस्तकावर पडलेत हेच तुमचे ब्रम्हज्ञान आहे काय? त्यावर विसोबा नामास म्हणाला की चुकीने माझे पाय शिवाच्या पिंडीवर पडले आहेत. माझ्यात उठ-ण्याची सुद्धा शक्ती नाहीं तू विष्णूभक्त भेटलास म्हणून बरे झाले आता माझे पाय उचलून थोडे बाजूस ठेव, नामदेवाने विसोबाचे पाय उचलून बाजूस ठेवले तो तेथेही शिवाची पिंडी दिसू लागली. त्याने अनेक ठिकाणी पाय सरकून पाहिले तो त्याला प्रत्येक ठिकाणी शिवलिंग दिसू लागले. तिळमात्र ही जागा त्याला रिकामी दिसेना तेव्हां तो आश्चर्यचकित झाला. त्याला देवळातील सर्व वस्तूंचा आकार शिवमय दिसत होता जे लोक स्त्री, पुरुष तेथे दर्शनास येत होते तेही त्यास शंकर-पार्वती दिसत होते. सर्व जगच शिवमय झाले होते तेव्हां विसोबा म्हणाले की मला कष्ट होत आहेत कोठेतरी धरणीवर माझे पाय टेकव. तेव्हां नामदेव म्हणाला तिळमात्रही जागा शिल्लक नाहीं जिकडे तिकडे कैलासनाथ दिसतात म्हणून मी तुमचे चरण धरले व तुम्हांस सद्गुरु मानून शरण आलो. मग विसोबाने नामदेवास उपदेश केला ते म्हणाले की शिवास पाच मुख व तीन नेत्र आहेत दहा हात आहेत त्याचे चरण सप्त पाताळापर्यंत आहेत ज्याचा महिमा वर्णन करण्यास शास्त्र, वेद, पुराणे सर्व असमर्थ आहेत. तो विश्वरूपी सर्व ठिकाणी आहे अशा शिवाचे चिंतन माझ्या हृदयात नेहमी चालू असते. हे ज्ञान मला सद्गुरु ज्ञानेश्वर माऊलीने दिले. हे ऐकून नामदेवाने विसोबाचे चरण धरले व म्हणाला की तुम्हीच माझे सद्गुरु आहात तुमचे चरण

हेच आमचे तारक आहेत तेव्हां विसोबाने उठून नामदेवास आशिर्वाद दिला व अनुग्रहीत केले. तेव्हां नामदेवास पांडुरंगाची लीला लक्षात आली. खरे साधू संत अगोदर वेड्या सारखेच दिसतात ते आपली योग्यता व अधिकार लोकांना समजू नये म्हणून मुद्दामच तसे वागतात परंतु सर्व ब्रम्हांड त्यांच्या हृदयी असते. साईबाबाही अशाच प्रकारची एक विभूती होती!

साईबाबांच्या सद्गुरु बद्दल माहिती उपलब्ध नाहीं. तरी भक्तांना उपदेश करतांना आपण बारा वर्षे गुरुगृही राहून तपश्चर्या केली व गुरुचे प्रेम व आशिर्वाद संपादन केले म्हणून सांगीत. ज्या निंब वृक्षाखाली बाबा नेहमी बसत तो वृक्ष अजूनही शिरडीत आहे. सुरवातीस याच ठिकाणी भक्तांशी बाबांच्या उपदेशाच्या गोष्टी चालत. एका भक्ताने बाबा आपण येथेच नेहमी का बसता असा प्रश्न विचारला. त्यावर साईबाबांनी येथे माझ्या गुरुची समाधी आहे असे उत्तर दिले. पुढे भक्त मंडळींनी ती जागा खणून पाहिली आणि आश्चर्य असे की त्या भुयारात समाधी आढळून आली. त्या समाधीवर टवटवीत ताजी सुगंधी फुले वाहिलेली होती व चारही बाजूस समया तेवत होत्या. इ. स. १९१२ मध्ये डॉ. रामराव कोठारे यांनी मुंबईहून पादुका तयार करून पाठविल्या. उपासनी महाराजांनी त्यांची शुद्धी व पवित्र संस्कार केले. नंतर कमलाकर दिक्षीतांनी खंडोबाच्या देवळातून त्या पादुका डोक्यावर घेऊन बाबांच्या जवळ नेल्या. ह्या पादुकांना बाबांनी कर स्पर्श केला आणि हे "सच्चिदानंद परमेश्वराचे पाय आहेत ह्यांना पवित्र निंबवृक्षाच्या खाली स्थान द्या." असा आदेश दिला त्याप्रमाणे श्रावण महिन्यात पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर त्या गुरु पादुकांची निंबवृक्षाखाली स्थापना झाली. व त्यासच "गुरु पादुका स्थान" असे म्हणतात. ह्या ठिकाणी बसून चिंतन केल्यास मनास सुख शांती लाभते व इच्छित फळ मिळते. साईबाबांची लीलाच अगाध आहे. ते सर्वज्ञ सर्वसाक्षी परमेश्वरच. जो त्यांच्या चरणी लीन झाला त्याचा नक्कीच उद्धार झाल्याशिवाय राहत नाहीं.

# पती व मुलास बाबांनीच बरे केले

—सौ. अंजली किरण शहा
५४, महावीर नगर,
सांगली – ४१६ ४१६.

० मी शिरडीचे परमस्वरूपी साईबाबांची लहानपणा पासूनच भक्त आहे. साईबाबांचे कृपेने मला सर्व काहीं लाभलेले आहे. त्यामुळे पूज्य साईबाबांची मला क्षणोक्षणी आठवण येऊन मन भारावून जाते. माझे सांकडे साईबाबांनी आतापर्यंत पूरे केलेले आहे. माझ्या पतींचे पोट मध्यंतरी फार फार दुखत होते. त्यांची एक्सरे तपासणी वगैरे सर्व तपासण्या झाल्या व त्यांना अल्सर आहे असे सांगितल्यावरून आम्ही घरातील सर्व मंडळी घाबरून सुन्न झालो व औषधे सुरू झाली. त्या दरम्यान एकाएकी साईबाबांची आठवण झाली व त्यांना त्यांचे फोटो पुढे उभे राहून त्यांची प्रार्थना करून सांगितले की "साईबाबा माझ्या पतीराजांना बरे वाटू दे आशिर्वाद द्या. मी "साईलीला" मध्ये आपल्या कृपेच्या अनुभवाची प्रचिती प्रसिद्ध करेन.

त्यानंतर आश्चर्य असे की आम्ही मिरजेस माझे पतिराजांना दुसऱ्या डॉक्टरना दाखवले. एक्सरे काढला. त्यांनी अल्सर नाही किरकोळ दुखणे आहे असे सांगितले पूर्वीचे डॉक्टरनी काढलेले एक्सरे चुकलेत, किरकोळ दुखणी एक महिन्यांत बरे होतील हे सांगताच आम्हां कुटुंबियांतील सर्वांना आनंद झाला. हे सर्व साईकृपेनेच झाले.

याचप्रमाणे माझ्या मुलाचे बाबतीतही मोठ्या आजारात नंतर मिरजेस दाखवले. त्यापूर्वी साईबाबांची प्रार्थना करून मुलास शिरडीस घेवून येईन असे सांगितले, तेव्हां मिरजेच्या तपासणीत डॉक्टरनी काहीं नाही, काळजी करू नका असे सांगितले, तेव्हां या दोनही वेळी असे वाटले की साईबाबांनी डॉक्टरांच्या मध्ये प्रवेश करून आम्हांवर कृपा केली. अशीच निरंतर कृपा असू द्यावी ही प्रार्थना असा नवस केल्यामुळे 'साईलीला'त प्रसिद्ध करावी ही विनंती.

☆

# श्री सद्गुरु साईनाथांची गुरुपौर्णिमा

—श्री. बाळकृष्ण अ. देसाई.
चंदन, वनराई को. हौ. सोसायटी
लोणावळा.

○ आषाढ पौर्णिमेला गुरुपौर्णिमा आणि व्यास पौर्णिमा असेही म्हणतात. व्यास हे महान् ऋषिवर्य होते. त्यांनी कितीतरी ग्रंथरचना केली, म्हणूनच प्राचीन काळचं ज्ञान आज आपणास उपलब्ध आहे. महाभारत व्यासरचितच आहे. त्यांच्या शब्दाला मोल होतं, मान होता, तशीच विद्वत्ताही होती, म्हणूनच आज ते सर्वांनाच आदरणीय आहेत.

साईबाबा हे असेच आधुनिक काळात होऊन गेलेले त्रिकालज्ञानी द्रष्टे महापुरुष होते. थोडक्यात वर्णन करायचं झाल्यास मानवी रूपात वावरणारं ते साक्षात् परब्रम्ह होतं. पाऊणशे वर्षांपूर्वी ह्याच आषाढ पौर्णिमेला त्यांनी त्यांच्या निकट वावरणाऱ्या माधवरावाला हाक मारून म्हटलं, "शाम्या, इकडं ये! मी रोज टेकून बसतो त्या ह्या खांबाची आज तू पूजा कर!"

"पण बाबा, मी ह्या खांबाची का म्हणून पूजा करावी? मी आज तुमचीच पूजा करीन!"

बाबांनी हे शाम्याला सांगितलं, तेव्हा तिथं नानासाहेब चांदोरकर, तात्यासाहेब नूलकर, काका दिक्षित वगैरे बाबांची भक्त मंडळी होती. आजच बाबा 'ह्या' खांबाची पूजा करावयास का सांगत आहेत, याचं त्यांनाही नवल वाटलं.

बाबांच्या ह्या आदेशाची प्रचिती घेण्यासाठी नानासाहेब ताबडतोब आपल्या रहात्या ठिकाणी गेले, नि प्रथम पंचांग पाहिलं. तेव्हां त्याचं आश्चर्य काहीसं कमी झालं. तो दिवस गुरुपौर्णिमेचा—व्यास पौर्णिमेचा होता. ताबडतोब सारे गुरु पूजनाच्या तयारीला लागले. तात्यांना बाबांच्या सांगण्यातली खोच कळून आली. गुरुपौर्णिमेला गुरुची यथासांग पूजा करायची असते. व्यासांचे शिष्य प्रतिवर्षी गुरुपौर्णिमेला व्यासांना फुलांनी मढवित नि यथासांग नवीन वस्त्रांनी त्यांना भूषवित.

नानासाहेबांनी इतरांना बाबांच्या पुजेची तयारी करण्यास सांगून स्वत: इतर दोघा–तिघांसह शेतात गेले. परड्या भरभरून फुलं वेचली, नि द्वारका-माईत येऊन आणलेल्या फुलांचे हार, गजरे केले. सर्वांनी बाबांच्या अंगाला उटण सुगंधी तेल लावून त्यांना सचैल स्नान घातलं. शामानं बाजारातून नवी वस्त्रं खरेदी करून आणली.

त्यानंतर सर्वांनी बाबांची षोडशोपचारे पूजा केली. मस्तकी गंधाचा टिळा लावून पुष्पे अर्पण केली. गळ्यात पायापर्यंत रूळणारे निरनिराळ्या फुलांचे सुंदर हार घातले. अंगा–खांद्यावर नवी वस्त्रे चढविली, अन् आरती ओवाळून बाबांसह सर्वांनी गोडधोड भोजन केलं.

सन १९०८ च्या गुरुपौर्णिमेपासून आजतागायत तो उत्सव प्रतिवर्षी आषाढ पौर्णिमेला अत्यंत थाटात नि उत्साहात साजरा केला जात असतो.

गुरु ही समाजातील अत्यंत थोर नि पूजनीय व्यक्ती. तिच्यापासून ज्ञान घेऊन जगात उजळ माथ्यानं वावरायचं असतं. त्या गुरुचे आपणावर झालेलं ऋण अंशत: तरी नवीन वस्त्रं, नवा अलंकार नि रुचकर भोजनानं मोठ्या भक्तिभावानं ते फेडायचं असतं. ज्ञानऋण हे कधीच फिटत नसतं. पण त्याची जाणीव ठेवणं नि त्याप्रमाणं वागणं हेच अंशत: तरी ऋणफेडीचं प्रतीक समजलं जातं.

बाबांनी आजच ह्या खांबाची पूजा करायला शामाला का सांगितलं ह्याचा सर्वांनाच उलगडा झाला, नि ते सारे बाबांच्या अगाध ज्ञानानं प्रभावित होऊन बाबा ही व्यक्ति नसून सर्वांना एकत्र आणून त्यांच्या उद्धाराचा मार्ग दाखविणारं दैवी प्रतिकच आहे, ह्याचं सर्वांना यथार्थ ज्ञान झालं

गुरु ही पूजनीय व्यक्ति. ह्या दिवशी पूर्वकाळपासून गुरुची यथासांग पूजा करून त्याला नवी वस्त्रं प्रदान करणं नि त्याला गौरविणं हे शिष्याचं आद्य कर्तव्य मानलं जात होतं. आजच्या काळात शाळातही 'शिक्षक दिन पाळला' जातो. गुरुबद्दल आदर प्रदर्शित करणं हाच त्यामागील हेतू असतो.

**'श्री सद्गुरु सच्चिदानंद साईनाथ महाराज की जय!'**

❖ ❖ ❖

# ....माझे अनुभव....

—श्रीमती कुसुम रघुनाथ माणिक.
जुना बांदरी मोहल्ला,
नवसारी — ३९६ ४४५.

जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।।

० १९४४ साली माझे लग्न झाले नि बडोद्याच्या माणिक घराण्यात मी आले. माझे माहेरचे आडनांव गुप्ते या घरात श्री साईबाबांची पूजा–अर्चा नित्य नेमाने होत असे. माझ्या वडिलांची व काकांची श्री साईबाबांवर खूपच श्रद्धा होती आमच्या लहान मोठ्या संकटाना ते धावून येत असत, आणि आम्हाला संकटमुक्त करीत.

माझे पति रघुनाथराव माणिक हे पोलीस खात्यात नवसारी येथे होते. त्यांचाही श्री साईबाबांवर दृढ विश्वास होता. १९६६ साली त्यांना हृदय-विकाराचा पहिला झटका आला आणि ते बेशुद्ध पडले. त्या अवस्थेत मी त्यांना पाण्यात उदी घालून पाजली त्यानंतर ते शुद्धीवर आले. हॉस्पिटलमध्ये २० दिवस विश्रांतिसाठी ठेवले होते. या दुखण्यातून ते उठले त्यानंतर ४ वर्षे त्यांनी नोकरी केली, व दहा वर्षांनी ते स्वर्गवासी झाले. जातांना काहींच त्रास न होता त्यांनी प्राण सोडला अगदी झोपेत. ते गेल्यापासून मात्र माझी तब्येत बिघडू लागली. ब्लडप्रेशर, ॲसिडिटी हे त्रास चालू झाले. अनेक व्याधी मागे लागल्या. औषधेही खूप झाली. डॉक्टरही खूप झाले. पण त्रास कायम चालू होता. मी बाबांचे नामस्मरण व स्तवनमंजिरी वाचन कायम चालू ठेवले होते. योगायोगाने नवसारीचे एक प्रख्यात आयुर्वेदिक डॉ. ओमप्रकाश बिर्ला वैद्य यांच्याकडे औषधासाठी गेले. हे वैद्य श्री साईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. यांचे औषध मी चालू केले व त्यांच्या औषधाने मी व्याधिमुक्त झाले. विशेष म्हणजे मी आता प्रकृतीने अत्यंत चांगली आहे आणि जमेल तेव्हा बाबांच्या दर्शनाला शिरडीस जाते.

## बाबांमुळेच नातूही झाला

० माझा मुलगा श्रीकांत माणिक सध्या एका बँकेत अधिकारी आहे. त्याचे लग्न होऊन ८ वर्षे झाली परंतु मूल होत नव्हते. त्याच्या पत्नीला तीनवेळा दिवस गेले होते पण ॲबॉरशन होत असे. त्यामुळे त्याची पत्नी खूपच नाराज झाली होती. चौथ्यावेळी मी बाबांना अगदी मनपूर्वक प्रार्थना केली. यावेळेस जर सूनेचे बाळंतपण सुखरूप झाले तर आम्ही बालकास घेऊन तुमच्या शिरडीस तुमच्या दर्शनाला येऊ आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुलगा झाला. बाळंतपण अगदी चांगले झाले व मी नवस केल्याप्रमाणे श्रीबाबांच्या दर्शनाला आम्ही सर्वजण नूतन बालकास घेऊन गेलो होतो.

## हरवलेली आंगठी सांपडली

**नवसास माझी पावेल समाधि धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं ।**
**नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य नित्य घ्या प्रचित अनुभवे ।।**

० पोलीस खात्यात वारंवार बदल्या होत असतात आणि त्या बदल्यां बरोबर सारा संसार घेऊन बदली झालेल्या जागेत जायचे तिथे मुलांच्या शिक्षणासाठी शाळा शोधायची आणि पुन्हा सारं जीवन नव्यानं सुरू करायचे. अशीच गुजराथ मधल्या सचीन गावी माझ्या यजमानांची बदली झाली होती त्यावेळची गोष्ट.

दिवस थंडीचे होते साधारण दिवाळी येण्यापूर्वी संध्याकाळी काळोख लवकर पडत असे. घरात लहान मूल आजारी होतं. गावात तर आम्ही नव्यानं आलो होतो अजून मुलाचे वडील घरी आले नव्हते. बाहेर काळोख पडला होता. रातकिडे किर्र किर्र करत होते. घरात मिणमिणत्या कंदिलाचा आधार घेऊन वाट पहात मी बसली होती.

इतक्यात दाराची कडी वाजली दरवाजा उघडला तर दारात हे उभे —
"उशीर झाला?"
"हो! हॉलीबॉल खेळत होतो".

"इतका उशीर काळोख होईपर्यंत?"

"खेळताना अंगठी हरवली खूप शोधत होतो मिळाली नाहीं."

त्यावेळेस ५ ग्रॅम सोनं किंमत जरी कमी असली तरीही ती महागच वाटत होती आम्ही खूप निराश झालो. घरात लहान मूल आजारी आणि वर परत अंगठी हरवली.

देवघरातल्या समयी मधली वात मी मोठी केली व अगदी गहींवरून बाबांपुढे हात जोडले आंगठी मिळू द्यात मी नारळ फोडेन. ते ही म्हणाले बाबांची कृपा असेल तर अंगठी मिळेल.

सकाळी आमच्या समोरच मैदानातला माळी दूध घेण्यास येत असे त्याला हे भेटले विचारलं, आंगठी मिळाली कां?

"नाहीं! मैदान साफ करताना कुठे मिळाली नाहीं."

हे निराश होऊन घरी आले मग माझी दोन मुलं श्रीकांत आणि प्रकाश आंगठी शोधण्यासाठी मैदानाकडे निघाले. मी बाबांच्या फोटोकडे पाहिलं व म्हणाले, 'बाबा आंगठी मिळू दे आणि त्यांना म्हटलं बाबांच नाव घेत जा. शोधा.

दोघही मैदानात आंगठी शोधू लागले शोधताना बाबांचं नाव घेत होते. श्रीकांतचा पाय तेथल्या एका विटेला लागला ती विट सरकली तशी माझा धाकटा मुलगा प्रकाशला अंगठी दिसली.

दोघेही अंगठी घेऊन घरी आले माझ्या हातात आंगठी दिली. मी बाबांच्या फोटोपाशी गेले आंगठी पुढ्यात ठेवली. माझ्या डोळ्यात आनंदाश्रू होते कोणत्या शब्दात बाबांचे आभार मानायचे कळत नव्हत पण कसे बसे शब्द बाहेर पडले बाबा अशीच कृपा आमच्यावर असू द्यावी.

# गुरुपौर्णिमा

—श्री. अरविंद बारटक्के.
१३५, शुक्रवार पेठ,
पुणे – ४११ ००२.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः ॥

० गुरुची महती या श्लोकात यथार्थपणे वर्णन केली आहे. गुरुशिवाय काहींही साध्य नाहीं, आणि गुरु असेल तर काहीच असाध्य नाहीं म्हणूनच--

गुरुनाम आणि गुरुसहवास ।
गुरुकृपा आणि गुरुचरण पायस ॥
गुरु मंत्र आणि गुरु गृहवास ।
महत्प्रयास प्राप्ती हो ॥ अ. १ ओ. ६८॥

वनामध्ये गुरुच्या आश्रमात विद्या शिकण्यासाठी जायचे व सर्व विद्यांत प्रवीण व्हायचे ही प्राचीन काळची परंपरा होती. आता विज्ञानयुग आले तेव्हां वनात वास्तव्य करणारे अथवा पूर्वीसारखे गुरु वा शिष्य राहिले नाहींत. कालानुसार त्यांचे स्वरूपही बदलले. तरी गुरुचे अस्तित्व आजही आहे. आजही त्यांची गरज आहे. त्यांचे अस्तित्वही चीरकालीन आहे. स्वरूप बदलेल परंतु अस्त्वित्व राहिलच. काहींना ग्रंथ गुरु वाटेल तर काहींना माणूस गुरुतुल्य भासेल तर काहींना देव, संत गुरुस्थानी वाटतील.

तद्वतच साई भक्तांना 'साईबाबा' हेच गुरुस्थानी वाटतात. आपल्या दैनंदिन, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक अडीअडचणीत साईची आठवण येते. स्मरण होते आणि साईचाच धावा सुरू होतो. मग दीनांचा कनवाळू, अनाथांची साईमाऊली भक्तांच्या हांकेला धावून जाते. त्यांना शांती सुखाचे वैभव भरभरून देवू करते. त्यांच्या दुःखात दिलासा देते, धीर देते. म्हणूनच साईचा 'श्रद्धा आणि सबुरी' हा संदेशही खूपसे काहीं सांगून जातो. 'श्रद्धा' आणि 'सबूरी' हे दोन शब्द केवळ शब्द नसून तो गुरुमंत्र आहे. साईचा मंत्र आहे. श्रद्धा ठेवून सबूरीनें वागावे हा साईचा – गुरुचा संदेश आहे.

**श्री सद्गुरु नाम पवित्र । हेंचि आमुचे वेदशास्त्र ।**
**'साईसमर्थ' आमुचा मंत्र । यंत्रतंत्रही ते एक ।। अ. १ ओ. ६२।।**

गुरु आपल्या शिष्याचे नेहमीच भले चिंतीत असतात. शिष्यावर अपार माया करतात. त्याचा उतराई होण्याचा दिवस म्हणजे 'गुरुपौर्णिमा' गुरुचे ऋण हे मातृपितृ ऋणाप्रमाणेच न फिटणारे ऋण आहे. म्हणूनच शिष्य गुरु पौर्णिमेस गुरुचे पूजन करून काहींसा ऋणमुक्त होण्याचा अल्प यत्न करतो.

साईबाबासुद्धा आपल्या भक्तगणांवर कायम कृपादृष्टी ठेवून असतात. त्यांच्या हिताकडे, सौख्याकडे साईचे लक्ष असते व आपल्या शिष्यास, भक्तांस ते नेहमीच निरनिराळ्या स्वरूपात मदत करतात. म्हणूनच त्यांचे गुरुपौर्णिमेस पूजन करणे म्हणजे आपणा साऱ्यांचा सौख्यदिनच म्हणावा लागेल. स्वतः साईनेच सांगितले आहे

**कुठेही जा दुनियेवर । मी तो तुम्हांबरोबर ।**
**तुम्हां हृदयीच माझे घर । अंतर्यामी तुमचे मी ।। अ. १५ ओ. ६९।**

गुरुपौर्णिमेस शिरडीत मोठी यात्रा भरते. अनेक भाविक भक्तगण दुरदूर-वरून साई दर्शनासाठी एकत्र येतात आपल्या गुरुची — साईची यथासांग पूजा करतात. साईचरणी लीन होतात. मनात, हृदयात, नयनात साईची गुरुमूर्ती साठवित दोन्ही कर जोडून नतमस्तक होतात. कृपाशिवाद मागतात आपल्या भक्तीची. साईवरील प्रेमाची गुरुदक्षिणा साईचरणी अर्पण करतात आणि त्यांवर संतुष्ट झालेले साई आपल्या कृपाळू तेजस्वी, ओजस्वी नेत्रातून आपल्या भक्तांवर प्रेमाची बरसात करीत आहेत असे वाटत रहाते. ते रूप सतत डोळ्यासमोर रहावे, क्षणभरही दृष्टी विचलीत होवू नये असे वाटू लागते

ते निर्मळ, सुंदर रूप, नजरेत, हृदयात साठवत साईचरणी — गुरुचरणी माझे शतशः प्रणाम.

**कर्मधर्म शास्त्रपुराण । योग याग अनुष्ठान ।**
**तीर्थयात्रा तपाचरण । मज एकचरण साईचे ।। अ. १ ओ. ८२।।**

**टीप** :— लेखातील प्रथम श्लोक सोडून इतर ओव्या साईसच्चरित ग्रंथातील आहेत.

४४　४४

# जया मनी जैसा भाव । तया तसा अनुभव ॥

—ॲड. के. के. थिटे.
बी. एस्सी., बी. एड्., एलएल. एम.,
२५८, कसबा पेठ, पुणे ११.

० श्री. दत्तावतार साईबाबा यांनी आपल्या असंख्य भक्तांना—सेवकांना आजपर्यंत ते हयात असताना व त्यानंतरही दृष्टांत तसेच प्रत्यक्ष दर्शन दिलेले आहे. मलाही श्री साईबाबांनी त्यांच्या मंदिरासमोर प्रत्यक्ष भिकाऱ्याच्या रूपात दर्शन दिले आहे.

मी नित्यनेमाने श्री साईमंदिरात, रासने चाळ, शिवाजीनगर पुणे या मंदिरात बाबांच्या दर्शनासाठी जातो, माझ्या मनात बरेच महिने दर्शनासाठी जाताना सारखे विचार यायचे की, आपण् श्रीबाबांचे मंदिरात केळी अर्पण करावीत. परंतु अनेक महिने हा विचार मनात असूनही कोणत्या न कोणत्या अडचणीमुळे मला माझी इच्छा पूर्ण करता आली नाही. २६ जानवारीला दुपारी सुट्टी असल्याने ऑफिसचे काम उरकून घरी येत होतो व येतांना रस्त्यातच एक विक्रेता (केळीवाला) भेटला व त्याच्या जवळची केळी पाहून ती विकत घ्यावीत अशी मला आंतरिक प्रेरणा झाली व त्याप्रमाणे मी ती केळी विकत घेऊन मोटारसायकलच्या बॅगेत ठेवली व राहते घराजवळ मोटार-सायकलीने येतांना एक अत्यंत तेजस्वी चेहऱ्याचा संन्यासी मला समोर दिसला. मी माझी मोटारसायकल थांबवून त्या संन्याशाला त्यातील केळी ताबडतोब दिली. त्या संन्यासाने प्रथम माझ्याकडे पाहिले व नंतर आकाशाकडे पाहून "भला" एवढेच शब्द उच्चारून माझ्यासमोरून क्षणार्धात तो कोठे निघून गेला ते मला समजले नाही, मी भानावर येऊन पाहिले त्यावेळी माझ्याजवळ कोणीही नव्हते. मी घरी येऊन विचार केला तेव्हां मला जाणवले की, आज गुरुवार आहे. साईबाबांनी आपल्या घरी आपल्या वारी म्हणजे गुरुवारी माझ्याकडून श्री साईबाबांनी केळी अर्पण करण्याची सुप्त इच्छा पूर्ण करून घेतली, तो दिवस इतर दिवसापेक्षा मला अत्यंत सुखसमाधानात गेला व त्यानंतर अनेक दिवसांची शिरडीला जाऊन श्री साईबाबांचे पत्नीसह दर्शन घेण्याची इच्छा पूर्ण झाली.

❋ ☆ ❋

# समर्थ साईनाथ, ज्ञानेश्वर, रामदास ह्यांचे अनुपम, अलौकिक लोकशिक्षण

—डॉ. अ. का. पाठक.
पाठकवाडी, गोरेगाव, मुंबई.

० श्री संत ज्ञानेश्वरांची "ज्ञानेश्वरी" ३०० वर्षानंतर सुप्रसिद्ध झाली. संत एकनाथ महाराजांनी ज्ञानेश्वरी प्रकाशात आणण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला होता. त्यानंतर ज्ञानेश्वरांच्या जिवंत समाधी असलेल्या आळंदीचे महत्त्व वाढले. सर्वसामान्य जनतेला आळंदीमध्ये प्रचिती येऊ लागली. ज्ञानोबांची आळंदी व तुकोबांचे देहू ही पवित्र तीर्थस्थाने म्हणून सर्वमान्य झाली.

श्री समर्थ रामदास स्वामी हे अजरा अमर रामभक्त होते. मारुतीचे अवतार मानले गेले. श्री छत्रपती शिवरायांना त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तद्वत् जनजागृती केली. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, तुकोबाची गाथा त्याप्रमाणे रामदास स्वामींचा "दासबोध" सुप्रसिद्ध झाला. सरळ सोप्या भाषेतला हा बोध खरोखरीच असामान्य अनोखा पण उपयुक्त आहे.

श्री समर्थ रामदासांचे अवतार असे समजले जाणारे श्री समर्थ साईबाबा शिरडीत अवतरले. संत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास आणि संत–समर्थ साईबाबा ह्यांच्यामध्ये ३००–३०० वर्षांचे अंतर दिसून येते. जन जागरणाचे कार्य ह्या समर्थ संतांनी सहेतुक केले. ज्ञानोबांचा वारकरी संप्रदाय आजही लाखाच्या संख्येत पंढरपुरी गोळा होतो. सज्जनगडावर दासनवमी निमित्त्याने, सुशिक्षित प्रधान संप्रदाय गोळा होतो. त्याचप्रमाणे लाखाच्या संख्येत समुदाय दसऱ्याला शिरडीत गोळा होतो. शिरडीच्या मेळाव्यात सुशिक्षित–अशिक्षित असे सगळेच साईभक्त गोळा होतात.

ज्ञानेश्वरांचे कार्य भक्तनिर्मिती व भक्तांसाठी झाले. रामदासांचे कार्यात राजकीय छटा उमटली. साईनाथ सर्व अनाथांचे नाथ झाले. राजकारणी असो, नसो सर्वांना ते समान आशिर्वाद देत. समर्थ साईनाथांची कृपा सर्वांवर होते.

प्रत्येक समाधी व दर्ग्याचा परिणाम प्रभावाचा कालखंड असतो. श्री साईबाबांचे शिरडीला मुंग्यांसारखी लोकांची गर्दी लोटेल हे भाष्य अक्षरशः

खरे ठरले आहे. पण साईनाथ समाधिस्थ झाल्यावर पाव शतकानंतर हा प्रभाव घडला. आजचे भारतातील जागृत, जिवंत, ज्वलंत, प्रभावी स्थान आहे. "साई-बाबांची शिर्डी".

शिर्डी ही आजची काशी, द्वारका, अयोध्या आहे. शिर्डी ही आजची मक्का, मदिना, मीना आहे. त्रिस्थळी चौदाधाम यात्राचे पुण्य शिर्डी यात्रेने प्राप्त होते. शिर्डी हे महाराष्ट्राचे प्रती पंढरपूर आहे. राजकीय पुढाऱ्यांना तर हे स्थान लाभदायक आहे. व्यापाऱ्यांना भाग्यदायक आहे. भक्तांना समाधान देणारे पवित्र तीर्थस्थान आहे.

आळंदी, सज्जनगड, शिर्डी ही महाराष्ट्रातील आजची तीर्थस्थाने आहेत. ज्ञानेश्वर, रामदास, साईबाबा ह्या सर्वांचे जन्मस्थान मराठवाडा आहे. साई-बाबांच्या शिर्डीत समाधीमंदिर म्हणजे काशी, द्वारकामाई ही द्वारका तर चावडी ही अयोध्या आहे. सर्व धर्म समभावाचे सम्यक दर्शन शिर्डीत होते. साम्य-वादाचा साक्षात्कार शिर्डीत घडतो.

लोकशिक्षणाचे कार्य संतांनी केले. निरंतर शिक्षणास संतांनी मार्गदर्शन व सहाय्य केले. लोकमनावर संतांनी सुसंस्कार घडविले. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी द्वारे प्राकृत भाषेत प्रथम लोकशिक्षणाचे कार्य केले. रामदासांनी दासबोधातून सोप्या भाषेत लोक शिक्षणाचे कार्य केले.

रामदासांनी दासबोधातून सोप्याभाषेत लोकशिक्षणाचे कार्य केले. काव्य ग्रंथाची रचना करण्याच्या चाकोरीतून लोकशिक्षणाचे कार्य केले. परंतु साई-रामांनी चाकोरीबाहेरील तंत्राने लोकशिक्षणाचे कार्य केले. श्रद्धा-सबूरीचा महामंत्र देऊन लोकशिक्षणाचे कार्य केले.

महाराष्ट्र ही संतांची भूमि आहे. लोक जागृती व लोकशिक्षणाचे कार्य संतांनी केले आहे. त्या त्या काळच्या समस्यानुसार सामान्यावर संस्कार कर-ण्याचे सत्कार्य त्यांनी केले. ज्ञानेश्वर काळात भक्तीमार्ग आणि वैष्णव संप्रदाय ही काळाची आवश्यकता होती. वैष्णव व शैव एकरूप होण्याची गरज होती. ह्या गरजेनुसार पंढरपूरच्या विठोबाचा गजर त्यांनीच केला. विठोबा कसा की ज्याच्या मस्तकी शिव-लिंग समान मुकुट आहे. असा शिव-विष्णू एकरूप विठ्ठलाचा आदर्श त्यांनी समाजापुढे मांडला.

समाजवादाचा आदर्श संतासमोर होता. हिंदू समाज पिडीत होता आता शक्तिसमृद्धीची व हिंदु जनजागरणाची अत्यावश्यकता होती. काळाची ही गरज समर्थ रामदासांनी ओळखली, आणि दासबोधाच्या माध्यमांतून रामदासांनी जनजागरण केले.

प्रगतीपथाची ३ री पायरी श्री समर्थ साईनाथांनी घडविली. वैष्णव शैवांचे एकीकरण ही प्रथम पायरी, समस्त हिंदू समाजाचे एकीकरण ही दुसरी पायरी तर सर्व धर्मांचे एकीकरण व समभाव ही बदलत्या काळाच्या प्रगतीची ३ री पायरी आहे. संत ज्ञानेश्वरांनी कालोचित १ ली पायरी गाठली. समर्थ रामदासांनी काळानुसार २ ऱ्या पायरीपर्यंत मजल गाठली. दोन्ही संत समर्थ यशस्वी झाले. त्यांचे लोकशिक्षण सफल झाले. काळाच्या गरजेनुसार समर्थ साईनाथांनी सर्व धर्म समभाव व साम्यवादाचे लोकशिक्षण चाकोरी बाहेरील पद्धतीने पण प्रभावीपणे केले. समस्त मानव समाजातील जातीभेद, धर्मभेद, गटभेद नष्ट करण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला. ज्ञानेश्वर, रामदास साई-बाबा ह्यांचे महान कार्य चढत्या भाजणीने झाले आहे.

शृंगेरी शेगाव शिर्डी ही त्रिस्थळी यात्रा आहे. साईबाबा ताजुद्दीनबाबा गजानन महाराज हे समकालीन तीन संत एकमेकांशी बंधूभावाने अध्यात्मिक संबंध ठेवून होते. संतांच्या सत्कार्यांच्या तिन–साखळीतील ज्ञानेश्वर, रामदास, साईबाबा म्हणजे माणिक–मोती आहेत. त्यांचे लोक जागृती व लोकशिक्षणाचे कार्य अजरामर ठरले आहे.

संतांच्या लोकशिक्षणाचे माध्यम प्राकृत भाषा आहे. ज्ञानेश्वरीची भाषा किंचित दुर्बोध तर दासबोधाची भाषा सुबोध, सरळ सोपी आहे. साईबाबांनी तर सरळ, सोप्या बोली भाषेचा उपयोग केला.

समर्थ रामदासांनी "मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" हा उपदेश महाराष्ट्र धर्मासाठी केला. त्यामध्येही पुढील काळाची चाहुल दिसते. "जयजय रघुवीर समर्थ" असा समर्थ मंत्र महाराष्ट्रास दिला. समर्थ साईबाबांनी "श्रद्धा–सबुरीचा" महामंत्र देऊन "अल्ला–मालिक", "अल्ला भला करेगा," "अनल हक्क" (मीच परमेश्वर) "यादे हक्क" (परमेश्वराचे स्मरण) सारखे बोली भाषेत उपदेश केले. मराठी व खडी बोलीचा उपयोग साईबाबांनी केला. आमच्या भारतात राष्ट्रभाषा व विभागीय भाषा यांचे

संमिश्रण बोली भाषेत दिसते. जनतेला समजणाऱ्या भाषेत त्यांनी लोकशिक्षणाचे कार्य केले.

शिक्षणशास्त्रात आजकाल कृती केंद्रित शिक्षणास महत्त्व दिले जाते. शब्द-पांडित्य आणि पुस्तकी पांडित्यापेक्षा कार्य–प्रधान शिक्षण महत्त्वाचे मानले जाते. भविष्यवेधी साईबाबांना हें माहित होते. त्यांनी कृती व घटनेतून उपदेश केला. प्रवचनें दिली नाहींत. खरे लोकशिक्षण कृतीतून करावे लागते तर सामान्यांना समजते. समाजाची नाडी साईबाबांनी ओळखली होती. समाजाची दुःखे त्यांनी जाणली होती. समता, बंधुता व ईश्वरावर श्रद्धा ह्या अत्यावश्यक उपदेशाचे महानकार्य, बौद्ध, येशू खिस्ताप्रमाणे श्री साईबाबांनी केले. समर्थ साईनाथ चरणकमली मस्तक ठेवून वाचकांना साईकृपा प्राप्त होवो. अशी सदिच्छा व्यक्त करतो.

★ ★ ★

# परदेशातील माझा अनुभव

—श्री. अनिल भा. राजाध्यक्ष.
शिवाजीपार्क, मुंबई ४०० ०२८.

० पहिल्याने आमच्या घरी इतर देवांप्रमाणे श्री साईबाबांची पूजा फक्त गुरुवारी केली जात असे. श्री साईबाबां विषयी खास भक्ती किंवा विश्वास असा आमच्या कुटुंबियांपैकी कुणालाही नव्हता. माझ्या लग्नानंतर माझे श्वशूर हरद्याचे श्री. गणपतराव आ. नाईक यांच्याकडून साईबाबांचे बरेच कृपानुभव आम्हांला समजले. तसेच 'साईलीला' मधील भक्तानुभव वाचूनही प्रत्यक्ष प्रचिती आल्याशिवाय विश्वास बसणे कठीण होते. परंतु गेल्या ३–४ महिन्यात मला स्वतःलाच श्री साईलीलेचे इतके अनुभव आले की ते सर्वच लिहून काढले तर एक पुस्तक तयार होईल. त्यातीलच एक अनुभव खाली देत आहे.

गेल्या नोव्हेंबर महिन्यात श्रीसाईकृपेने मला कंपनीच्या कामासाठी परदेशी जाण्याची संधि मिळाली. इतर अनेक वस्तूंबरोबर माझ्या पत्नीने श्रीसाईबाबांची

उदी व साईलीला मासिकाचा दिवाळी अंक दिला होता. रोज उदी लावावी व अंक वाचावा असे वारंवार सांगितले होते.

मॉरिशसमधील काम संपवून मी दक्षिण आफ्रिके जवळील बोट्सवाना या देशात जायला निघालो. वाटेत जोहान्सबर्ग या द. आफ्रिकेतील शहरात मला एक रात्र थांबावे लागणार होते. परंतु द. आफ्रिकेच्या वर्णद्वेषी धोरणामुळे मला ही रात्र कशी पार पडेल अशी काळजी वाटत होती. अखेर विमानात मी साईबाबांची उदी लावली व साईलीला मासिकावरील त्यांच्या फोटोला नमस्कार करुन सांकडे घातले की जोहान्सबर्गमधील ती रात्र काही एक त्रास न होता पार पडून मला सुखरुपपणे बोट्सवानाला पोहोचू दे, आणि काय आश्चर्य जोहान्सबर्ग विमान तळावरील सुरक्षा अधिकारी वा कस्टम अधिकारी यांजकडून काहीहि त्रास न होता (आणि ते देखिल मी भारतीय असतांना) मी विमान कंपनीच्या ऑफिसात पोहोचलो तर त्यांनी फक्त पंधरा मिनिटात मी न मागता माझी व्यवस्था त्याच इमारतीमधील हॉटेलातील एका आलिशान खोलीत केली व ती देखील त्यांच्या खर्चाने. दुसरे दिवशी पहाटे विमानतळावरील कर्मचाऱ्याने माझ्यासाठी नास्ता वगैरे आणला व नंतर बोट्सवानाकडे जाणाऱ्या विमानात माझे सामान न्यायची व्यवस्थाही आपणच केली. जोहान्सबर्ग विमानतळावरुन आमच्या विमानाने उड्डाण केले. तरीही माझा विश्वास बसत नव्हता. की आपण द. आफ्रिकेत नुसता पाय ठेवला नाहीं तर एक रात्र ऐषआरामात काढली.

आपल्यापैकी अनेकांनी द. आफ्रिकेच्या वर्णद्वेषी धोरणाच्या अनेक गोष्टी ऐकल्या असतील तेव्हां माझा वरील अनुभव पटणे कठीणच. परंतु श्री साईबाबा पाठीशी उभे असल्यावर असा एकच का अनेक अनुभव साईभक्तांना येणे अशक्य नाहीं. म्हटलेच आहे की,

**बाबांचा करिता धावा**
**दुःख न येई अपुल्या गावा!**

# श्री बाबांचा मूर्तिमंत साक्षात्कार

—श्री. मधुकर अंबाडे.
अंबाडे हाऊस, दांडिया बाजार,
लकडी पुलासमोर, बडोदा ३९० ००१.

० संतचुडामणी श्री साईबाबांचा महान संदेश! जीवनाचा आधारस्तंभ! दोनच बहुमोल शब्दात व्यापक अर्थ! श्रद्धेमध्ये किती प्रचंड शक्ती आहे हे सिद्ध करणारी ही एक सत्यकथा आहे. श्रद्धेचं सामर्थ्य सिद्ध करणारा चमत्कार! बाबांचा मूर्तिमंत साक्षात्कार! ह्या श्रद्धा शक्तीमुळेच बडोदे शहरात गेल्या दोनच वर्षापूर्वी एका निस्सीम साईभक्त बाईंना मार्गदर्शन करण्यासाठी साईभक्ती दृश्यमान झालेली आहे!

श्रीसाईबाबांनी दिलेला श्रद्धा आणि सबूरीचा संदेश म्हणजे ज्ञानामृताने भरलेल्या महालाचे प्रदेशद्वार ह्या दोनच गोष्टी कुणालाही आपोआप वा नकळतही ज्ञान मार्गाकडे घेऊनच जातात!

श्रीसाईबाबा भाळी कुणालाही गंध लाऊन देत नसत. परंतु एका भक्ताने प्रेमाच्या भरात कपाळी गंध लावले असताना, बाबांनी मोठ्या आनंदाने त्याचा स्वीकार केला. विचारणा केल्यावर बाबा म्हणाले, "काय करू त्याच्या प्रेम-भावामुळे मी त्याचा अंकित झालो. "आजही हा साई भक्तांचा अंकित आहे. आवश्यक आहे ती फक्त दृढ श्रद्धा!"

श्रीसाईबाबांना देह सोडून पासष्ट वर्षे होऊनसुद्धा त्यांच्या वचनाप्रमाणे त्यांचे कार्य आजही अविरतपणे चालत आहे. त्यांच्या ह्यातीत ते जे जे बोलत असत ते ते घडत असे आणि आजही घडत आहे. ही धुनी अशीच अखंड जळतच राहील असे म्हणणाऱ्या साईंची धुनी आजही जवळ जवळ एक शतका-पासून तर अखंड जळत आहे. पुढेही ती जळत राहिल. शंकाच नाही.

श्रीबाबा म्हणत असत —

**नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ।**
**नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥**

आणि आज असंख्य भक्त म्हणत आहेत —

**घ्यावा आता अनुभव कोणी, येईल प्रचिती ।**
**ठेवा साई निशिदिनी ध्यानी, भक्ती हीच शक्ती ।।**

खरोखर भक्तीच्या शक्तीने प्रचिती किंवा अनुभूती करवून व्यक्तीला उच्च स्थितीची प्राप्ती करून देऊन, श्रीबाबा शेवटी मुक्ती आणि शांती बहाल करतात.

स्वामी विवेकानंदानीहीं आपल्या एका भाषणात म्हटल आहे की, "देव-देवता म्हणजे दुसरे तिसरे काही नसून उच्च अवस्था प्राप्त झालेल्या दिवंगत व्यक्तीच होत" त्यांनी पुढे म्हटलं आहे, "उठल्या सुटल्या प्रत्येकाला काही आचार्य वा गुरु बनता येत नाहीं; परंतु मुक्त मात्र पुष्कळांना होता येत" ह्या मुक्तीच्या मार्गावर वाटचाल करण्यासाठी हा साई सदैव सर्वांनाच सहाय्य करतो!

आपल्या वचनानुसार आजही बाबा प्रत्यक्षात भक्तांना दर्शन देतात, ही वस्तुस्थिती आहे. बडोदे शहरात बाबांच्या एक निस्सिम भक्त श्रीमती सावित्री-बेन घनश्यामभाई जोशी, ह्यांच्या घरी प्रत्यक्ष येऊन दर्शन दिलेलं आहे. (पत्ता : ११ बी, शैमी सोसायटी, सुभानपुरा, बडोदे) इतकच नव्हे तर समक्ष गोष्टी करून योग्य मार्गदर्शनही केलेलं आहे.

गुरुवार ता. १८ मार्च १९८२ च्या दिवसाची ती सोनेरी संध्याकाळ होती! दोन्ही मुलं परदेशात वास्तव्य करत असल्यामुळे घरात फक्त हे एकच वृद्ध दांपत्य आहे. नामःस्मरण, भजन, किर्तन हाच दैनंदिन कार्यक्रम. वरील गुरुवारी सत्संगाची समाप्ती झाल्यावर, ह्या बाई एकट्याच घरात असतांना साधारणपणे पावणे सहा वाजता दार ठोठावलं गेलं म्हणून त्या बाहेर आल्या. बघतात तो, गर्द केशरी रंगाची पायघोळ कफनी घातलेले, हातात कमंडलू घेतलेले, दिव्य तेज असलेले हे बाबा दृष्यमान झाले! ब्रम्हस्वरूप तेजोमय, प्रसन्न व्यक्तिमत्व पाहून बाई अतिशय प्रभावित झाल्या. प्रथम भेटीतच कुणालाही आईस्वरूप वाटणाऱ्या ह्या बाईच्या नजरेत मातेची ममता, वागणूकीत निःस्वार्थ सेवा आणि बोलण्यात प्रेमभाव, आपुलकी दिसून येईल!

बाबांनी आपल्या भावपूर्ण वाणीनं विचारलं,
"जोशीका मकान यही हैं?"

बाईंनी अतिशय विवेकानं आणि नम्रतेनं उत्तर दिलं "हां बाबा आओ बेसो."

बाबा झोपाळ्यावर येऊन बसले. अशा प्रसंगी का कुणास ठाऊक पण मायेचा पडदा डोळ्यावर येतो की काय असं वाटतं. प्रत्यक्ष शिरडीच्या साई-बाबांसारखाच चेहरा, काहीच फरक नाहीं, असं असूनसुद्धा हे बाबाच आहेत की नाही ह्याचा त्या विचार करू लागल्या.

बाबा निक्षून म्हणाले, "हम तुम्हारे मा–बाप है के नहीं?"

बाई अत्यंत नम्रतेनं म्हणाल्या, "हां बाबा! हां ना."

नाराजीच्या स्वरात बाबा म्हणाले, "ये सब झगडा क्यों है?"

बाई : "बाबा! हम कहीं जाते आते भी नहीं हमारा किसीके साथ झगडा नहीं है."

बाबा : (निक्षून) अरे किसीके साथ नहीं लेकिन बच्चे के साथ उसकी बात करता हूं."

(घरातील गुप्त गोष्ट बोलल्याचर बाई दिग्मूढ होऊन पहातच राहिल्या).

बाबा : "हम तुम्हारी सब भूलें माफ करते है के नहीं?"
बाई : "हां बावा! करते हो ना".
बाबा : "तो फिर तुमने तुम्हारे बच्चोंको माफ नहीं करना चाहिये?"
बाई : "हां बाबा! करना चाहिये!"
बाबा : "क्या ये सब झगडा झगडा!"
"तुम्हारे कितने बच्चे है?"
"पांच–छे है?"
बाई : "ना बाबा, दो ही है."
बाबा : "तो फिर क्या ये झगडा झगडा!"

बाबांचं बोलणं ऐकून बाईंनी शरणांगतीच स्वीकारली! माफी मागितली नाहीं. माफी मागण्यातही सूक्ष्म अहम् आहे. ह्या मातृतुल्य बाईच्या मनी अहम् कुठून असणार?

बाई : "बाबा! बैठो आपके लिये पानी लाती हूं"

येवढं बोलून त्या आत गेल्या, आणि पाणी घेऊन येतात तर झोपाळ्यावर कोणीच नाहीं. त्यांनी ओसरीत पाहिलं, बागेत पाहिलं तिथेही कोणी नव्हतं. बागेतील लोखंडी दाराचा हमखास आवाज होतोच, परंतु आवाज तर झाला नाहींच, शिवाय बाहेरील रस्त्यावर शेवटपर्यंत कोणी दिसलंही नाहीं. शेजारी विचारलं, सर्वांनी शोधलं पण बाबा काही कुठे दिसले नाहींत? भक्तांसाठी दृष्यमान झालेली साईशक्ती पुन्हा अदृष्य झाली! भक्तांकित तू साई! असच म्हणावं लागेल.

बाबांचा शोध करून कुतुहल युक्त मनानेच, सोसायटीतील आजूबाजूचे रहिवासी घरात आले; आणि दुसरा चमत्कार घडला! संबंध घरात, व बागेपर्यंत उदीचा एक विशिष्ट प्रकारचा सुगंध दरवळत होता. खास आश्चर्य म्हणजे तो सुगंध सतत चार दिवस पर्यंत राहिला. आजूबाजुच्या लोकांनी प्रत्यक्षात अनुभव घेतला आणि ते आश्चर्यचकित झाले.

तिन्हीसांज झाल्यावर दिवाबत्ती वगैरे करून स्वयंपाकघराच्या दारात विश्रांतीसाठी बाई बसल्या होत्या. अजूनही घडलेल्या चमत्काराचेच विचार त्यांच्या मनात चालू होते. त्यांच्या मनातील आनंदाला तर पार राहिला नव्हता! ईश्वर आनंदस्वरूप आहे. ह्याची साक्ष मनाला संपूर्णपणे पटली होती! तेवढ्यात ओसरीतून येणाऱ्या ओझरत्या प्रकाशात त्यांना, बाबांनी ज्या जागेवर आपले पाऊल ठेवले होते त्या ठिकाणी उदीचे पाऊल प्रत्यक्षात दिसले! त्यातील थोडी उदी सर्वांनी प्रसादरूपानं घेतलीसुद्धा! साक्षात साईबाबा येऊन गेल्याची बाईंना खात्री तर झाली होतीच परंतु आता मात्र त्यांच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. त्यांची बाबांवरची अढळ श्रद्धा अधिकच अढळ बनली आणि आजच्या कलीयुगातही त्या परमानंद स्वरूप जीवन जगत आहेत!

श्री बाबा येऊन गेल्यानंतर त्या स्थानी येऊन घडलेल्या साक्षात्काराची परिणामकारक अनुभूती अनेकांनी अनुभवली त्या वातावरणात एक प्रकारची निराळीच दिव्य प्रसन्नता, शांतताही त्यांनी अनुभवली. बागेतील झाडंही टवटवीत होऊन डोलत होती.

बाईंचे पती श्री. घनश्यामभाई जोशी, एक सुशील, सद्मार्गी गृहस्थ आज निस्सीम साईभक्त बनले आहेत! साई नामस्मरण हेच उभयतांचे जीवन बनले

आहे! परम शांतीमय मनःस्थितीत भजन, कीर्तन, ऐकणे हीच दिनचर्या झालेली आहे! मनाने कधीही कुणाचेही वाईट न चिंतणारे सतत साई चिंतनात रहाणारे हे शांतिप्रिय दांपत्य पाहिल्यावर साईबाबांच्या वचनांची आठवण झाल्यावाचून रहात नाहीं.

**मग जो गाई वाडे कोडें । माझें चरित्र माझे पवाडे ।**
**तयाच्या मी मागे पुढें । चोहींकडे उभाचि ॥**
**कोणीही केल्या माझें कीर्तन । तयासी देईन आनंदघन ।**
**नित्य सौख्य समाधान । सत्य वचन मानावे ॥**

बाबांच्या ह्या उदी पादुकांचे दर्शन आपण आजही प्रत्यक्षात घेऊ शकतो. श्री घनश्यामभाई ह्यांनी त्याच ठिकाणी फरशीवर हवाबंद काचेची पेटी तयार करून घेतली आहे. ह्या उदीपादुकांचे दर्शन घेतल्यावर बाबा आपल्या वचनाला कसे जागतात ह्याची प्रचिती आल्यावाचून रहात नाहीं. एक निराळीच प्रसन्नता निराळाच आनंद, मंदिरमय वातावरण, शांती आजही ह्या घरात आहे!

शेजारच्याच सोसायटीतील एका साईभक्त कुटुंबातील परम साईभक्त असलेल्या एका बाईंना बाबा स्वप्नात आले होते, आणि आपल्या भारदस्त आवाजात बाबा म्हणाले, "जोशीका घर घर नहीं, मंदिर है, मंदिर!"

बाबांच्या बोलण्यात किती सत्यता आहे! प्रत्यक्षातही तोच अनुभव येतो!

श्रीसाईबाबांनी त्या बाईंना दिलेले मार्गदर्शन आज आपणा सर्वांनाच किंबहुना सर्व जगालाच मार्गदर्शक आहे. बाबांच्या शिकवणुकीचा सार एकच की, दरेकाने विवेक जागृत ठेऊन इतरांच्या चुका पोटात टाकाव्या व क्षमाशीलता बाळगून प्रेमाचा आणि शांतीचाच मार्ग स्वीकारावा. परंतु 'फुफकारो लेकिन काटो मत' ही नीति लक्षात ठेऊन!

# एक आधार श्री साई

–सौ. शोभा जोशी.
द्वारा श्री. वासुदेवराव जोशी
चिटणीसकी गोठ, पारनेरकरके पास,
लष्कर, ग्वालियर (म. प्र.)

० मी नेहमी विचार करते की जे काही होणार ते सर्व श्री साईंच्या कृपेनेच. माझा विश्वास व श्रद्धा पूर्ण रूपाने श्री साईचरणी निरंतर राहो ह्याशिवाय दुसरे मला काही भासत नाहीं. माझी श्रद्धा गेल्या तीन वर्षांपासून दृढ होत चालली आहे ती अशी की माझे यजमान नेहमी खूपच आजारी रहात. मला त्यांची फार काळजी वाटायची. परंतु गेल्या तीन वर्षांपासून मला ह्यांच्या प्रकृतीत चांगलाच फरक वाटतो आहे. माझा नुसता भ्रम नव्हे तर खरोखरच मला गेल्या तीन वर्षांपासून हॉस्पिटलचे तोंड पहावे लागले नाहीं. तर ही सर्व श्रीसाईंची कृपा होय!

दुसरी गोष्ट अशी की माझा परीक्षा निकाल येणार होता. परंतु मला अगदी विश्वास बसत नव्हता की मी ह्या वर्षी परीक्षेत पास होईन तर मी मनात श्री साईबाबांचे ध्यान करीत असते व माझा विश्वास श्री बाबांवर आहे. तेव्हां जे काहीं होणार ते सर्व त्यांच्या मर्जीप्रमाणेच होणार आहे तर आश्चर्य खरो-खरच तेव्हां वाटले. जेव्हां माझा निकाल लागला व मी त्यात पास झाले तेव्हां मला पूर्ण रूपात असे भासले की साईंनी आपल्याला धक्का देऊन पुढे नेले. तेव्हां माझा निरंतर असाच आजन्म दृढ श्रद्धाभाव श्री साई चरणी राहो व माझी सर्व चिंता त्यांचीच आहे व श्रद्धा व सबूरी माझ्या बहिणी आहेत त्यांच्या मदतीने माझे अवशेष जीवन सफल होईल अशी मनोकामना करते!

सकाळ–संध्याकाळ सतत मी बाबांचे ध्यान करते व माझ्या घरात श्री साईबाबांची प्रतिमा असून जणू त्यांची साक्षात् मूर्तिच आहे असे मला भासते मला शारीरिक, मानसिक काहींही त्रास झाला की मी बाबांसमोर माझे संकट मांडते व तुला जे करायचे असेल तेच कर तेव्हा मला असे वाटते की खरो-खरच ते माझे शब्द ऐकतात व मला अशी त्यांची नेहमीच प्रचिती येते तर मला असे वाटते की बाबा आपल्या भक्तांवर कधी आपदा येऊ देत नाहींत आणि आली तरी त्यांनी भक्ताचे काहींच न जाता नवीनच काही अनुभवाला येते. अशी ही साईमाऊली सदा ठाईच बसून सर्वांचे रक्षण करते तेव्हां बाबांना कोटी–कोटी प्रणाम.

# सूनेचा हार सापडला

—सौ. शकुन्तला एकनाथ हळदणकर.
८, देव प्रकाश, रोशन नगर रोड, चंदावरकर
रोड, बोरीवली (पश्चिम) मुंबई – ४०० ०९२.

० सोमवार दिनांक २८ नोव्हेंबर १९८३ ला माझ्या मोठ्या दिराच्या मुलाचे लग्न होते, आम्ही घरातील सर्व मंडळी सकाळीच हॉलवर गेलो होतो, लग्नकार्य व्यवस्थित पार पडले. रात्री घरी येण्यास ११ वाजले. आम्ही थकून–भागून आलो होतो. सर्वांनी कपडे वगैरे बदलले, अंगावरचे दागिनेही काढून ठेवले माझी एक मुलगी बिछाने घालू लागली, दागिन्याच्या पेटीत माझी सून सौ. संजिवनी दागिने ठेवू लागली, पाहते तर नेमका तिचा हारच नाहीसा झालेला, घरी येईपर्यंत तिच्या गळ्यात हार होता, ती सांगू लागली मी हार इथेच कॉटवर काढून ठेवला. आम्ही सगळीकडे शोधाशोध सुरू केली. कॉटवरील बिछानाही काढून पाहिला. घरात आजूबाजूला पाहिले पण हार कुठेच मिळेना, आम्ही सगळेच रडकुंडीला आलो, कारण हल्लीच्या परिस्थितीत पुन्हा हार करणे शक्यच नव्हते.

माझे दिर बाजूच्याच गल्लीत रहात होते. यदा–कदाचित त्यांच्या घरी गेलो असता चुकून हार तिथे पडला असेल म्हणून रात्री पुन्हा त्यांच्या घरी माझा मुलगा गेला पण तिथेही शोध करून हार मिळाला नाहीं. माझी अगदीच केविलवाणी अवस्था झाली, शेवटी मी देव्हाऱ्याजवळ जाऊन उभी राहिले आणि साईबाबांच्या तसबिरीपुढे सांगणे केले; "बाबा तुम्ही भक्तांच्या हांकेला धावून येता आणि त्यांच्या संकटकाळी त्यांना मदत करता! मी तुम्हांला शरण आले आहे माझ्या सूनेचा हार मिळू दे" असे म्हणून मी बाबांना नमस्कार केला. अशा द्विधा मनःस्थितीत आम्ही सगळेजण झोपी गेलो, मला रात्रभर झोप आली नाहीं, सकाळीच उठल्याबरोबर प्रथम सर्व बिछाने काढले, आणि सर्व अंथरूणे उलट सुलट तपासली, यदाकदाचित् साडीला हार लटकला असेल म्हणून पुन्हां एकदा साडी पाहिली माझी सून तर सारखी म्हणत होती की, मी हार इथेच काढला म्हणून! पण हार काहीं मिळत नव्हता. शेवटी मी कचरा काढण्यासाठी केरसुणी घेतली व बाजूला कपाट होते तेथून कचरा काढायला सुरवात केली, कपाटाखाली केरसुणी घातली आणि बाजूला सरकवली तर अलगद कागद बाहेर आला, व त्या कागदावर हार होता, रात्री इतका शोध करूनही जो हार मिळाला नाहीं तो माझ्या बाबांच्या आशिर्वादान मिळाला, मला खूप आनंद झाला, घरच्या सगळ्यांना आनंद झाला, आणि माझी बाबांवरील श्रद्धा अधिकच गाढ झाली.

# प. पू. साईबाबांच्या कृपाप्रसादाचे मला आलेले अनुभव

★★★☆★★★✠★★★

—कु. उज्वला नारायण दिक्षित
बी–११, मधुमनिषा को. हौ. सोसायटी
सांताक्रूझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५.

० एप्रिल १९८३ मध्ये झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कॉमर्स (बी. कॉम) परीक्षेचा निकाल दि. १६ जुलै १९८३ रोजी जाहिर झाला. मी या परीक्षेत अनुत्तीर्ण झाले. सर्व पेपर चांगले जाऊनसुद्धा परीक्षेत नापास झाल्यामुळे वाईट वाटले व त्याबरोबर आश्चर्यसुद्धा वाटले.

मला फायनॅनशियल अकांउटनसी पेपर १ मध्ये २२ मार्क मिळाले. माझी अपेक्षा ४५ च्या पुढे मार्क मिळावेत अशी होती म्हणून मी मुंबई विद्यापीठाकडे फायनॅनशियल अकांउटनसी पेपर १ चे पुनर्मूल्यांकन करण्याकरिता अर्ज भरला. अर्जाचे उत्तर १ महिन्याचे आत पाठवू असे सांगितले. परंतु २ महिने झाले तरी उत्तर न आल्याने माझ्या आईने परमपूज्य श्री साईबाबांना कळकळीची प्रार्थना केली की, कृपया ८ दिवसांच्या आतमध्ये पुनर्मूल्यांकनाचे अनुकूल उत्तर येऊ दे. ही प्रार्थना आईने दि. १५ सप्टेंबर रोजी म्हणजेच गुरुवारी केली व बरोबर ८ दिवसांच्या आतमध्ये म्हणजे दिनांक २२ सप्टेंबर रोजी मला पुनर्मूल्यांकनाचे अनुकूल उत्तर आले व मी फायनॅनशियल अकांउटनसी पेपर १ मध्ये पास झाले. केवढा हा परमपूज्य श्रीसाईबाबांचा चमत्कार!

दुसरी घटना, माझ्या तब्येतीची तक्रारसुद्धा श्रीसाईबाबांची उदी पाण्यातून नियमित घेतल्यामुळे दूर झाली. खूप डॉक्टरी औषधे घेऊनसुद्धा तब्येत सुधारण्याची व तब्येतीची तक्रार दूर होण्याची लक्षणे दिसत नव्हती. ती साईबाबांच्या उदीमुळे लगेच दूर झाली व पुन्हा ती तक्रार कधीच उद्‌भवली नाही.

★ ★ ★

# जो जो मज भजे जैसा जैसा भावे ।
# तैसा तैसा पावे मीहीं त्यासी ॥

–सौ. उषा महादेव जोशी.
मसुरेकर बंगला, पेट्रोल पंपाजवळ,
बी. के. कॉलेज लायब्ररी समोर, वेंगुर्ला

० जाने. १९८३ चे वर्ष नुकताच श्री साईबाबांच्या कृपेने मला पुत्ररत्न झाले. त्यांचाच प्रसाद म्हणून नाव 'प्रसाद' ठेवले. फेब्रु. चे सुमारास तो पाचच महिन्यांचा होता अचानक त्याच्या तोंडाला सुज आली. पावले देखील खूप सुजली व मधील डोक्याखालून पावला पर्यंत सर्व भाग एकदम बारीक झाला. रात्रंदिवस रडत राहात असे. सर्व प्रकारचे डॉक्टर पालथे घातले कोणालाच निदान लागेना. कोणी सांगितले याला दूध पचत नाहीं तर 'नेस्टम'वर ठेवा. परंतु तरीही त्याचे रडणे काहीं कमी झाले नाहीं. शेवटी आम्ही मिरज मिशन गाठले व बाबांचे नाव घेत घेत तेथील डॉक्टरांना सर्व हकीगत सांगितली. तेव्हां त्याचे वय ६ महिने, वजन ७ पौंड. जन्मला तेव्हां पावणेसात पौंडाचा होता. त्यांनी काहींहि काळजी करू नका. व ताबडतोब ॲडमिट करणेस सांगितले आणि बाटलीचे दूध बंद करून चमचे वाट्या उकळून दूध देणेस सांगितले व ताबडतोब दीड ते दोन बाटल्या रक्त चढवावे लागेल असे ते म्हणाले रक्त, सलाईन, सर्व प्रकार चालूच होते. परंतु श्री साईबाबांचे कृपेने तो ८,१० दिवसांतच व्यवस्थित दूध वगैरे हळूहळू सर्व पचवू लागला. त्यामुळे डॉ. आता डिसचार्ज देतील असे वाटले व दिला देखील.

तोच अचानक दुसरे दिवशी दररोज ब्लड व स्टूल तपासणी चालू होती तेव्हां त्यांच्या मते शौचावाटे रक्त प्रत्येक वेळेस जात होते व त्यामुळे मुलगा पांढरा फटफटीत पडून रक्त कमी झालेचे त्यांना वाटले व त्याकरिता एक मोठी शस्त्रक्रिया करावी लागेल असे सांगितले मनास मोठे धस्स् झाले. मुलगा ६ महिन्यांचा पूर्ण बरा झालेला मोठेच संकट उभे राहिले मनातल्या मनात बाबांचा धावा केला ऑपरेशन टळू दे आणि खरोखरीच बाबांनी हाक ऐकली एवढ्या छोट्या लेकराचे ऑपरेशन टळले. ८,१० एक्सरे काढले कशात देखील ऑपरेशन करण्यासारखा दोष दिसला नाहीं सर्व एक्सरे निर्दोष होते तेव्हां पासून आम्ही कायम आमच्या मुलांना उदी लावून कोठेही नेले तरी काहींहि होत नाहीं. पूर्वी मला कोकणात खूप भिती वाटायची. परंतु गेली दोन वर्षे आम्ही सतत बाबांचे वास्तव्य फोटोरूपाने व उदी ठेवलेने आता कशाचीच कोणत्याही संकटाची भीती मला आता अजिबात वाटेनाशी झाली आहे.

# ....आणि मी पास झालो

—श्री. अनिल विश्राम आकेरकर.
ब–९४–३, सरकारी वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

"अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम ।।"

० स्वतःच्या बुद्धीने जीवनाची दिशा न ठरविता सर्व ईश्वरावर टाकून आपण त्याचे प्रेमभक्तिपूर्वक चिंतन करावे, मग जीवनाला योग्य वळण तो देतो. ऐहिक जीवनाला अवश्य ते तोच देतो. जीवनसाफल्यासाठी जरूर तेही तोच करतो. योग म्हणजे नवीन, अप्राप्त गोष्टींची प्राप्ति; क्षेम म्हणजे आहे त्याचे रक्षण. प्रपंच–परमार्थ या दोन्ही क्षेत्रात योगक्षेम ईश्वर चालवितो. अर्थात् पारमार्थिक योगक्षेमाला अवश्य असाच प्रापंचिक योगक्षेम देव चालवितो.

"जो अनन्यभावे माझे पूजन, चिंतन करतो त्याचा योगक्षेम सांभाळण्याचे कार्य मी पार पाडतो." असे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला गीतेच्या वरील श्लोकात (अध्याय नववा श्लोक बावीस) परमेश्वर व भक्त यांचे नाते विशद करून सांगितले आहे.

'श्री सद्गुरु साईबाबा' आणि भगवान श्रीकृष्ण यातील अंतर आहे युगायुगाचे परंतु अवतार कार्य एकच सज्जनांचे रक्षण आणि दुष्टांचे निर्दालन ... अशा श्री साईबाबांचे अवतार कार्य सुरू झाले महाराष्ट्राच्या पुण्यभूमित ... शतकानुशतके, ज्याला अध्यात्माचा वारसा लाभलेला आहे, आसमंतात भक्ति आणि श्रद्धा याचे नाव भरभरून राहिले आहेत अशा महाराष्ट्र देशात ...

आज जगाच्या दशदिशात साईबाबांची कीर्ती पसरली आहे उत्कट अशा श्रीसाईलीलांनी ... आणि या साईलीला म्हणजे विलक्षण आणि अगम्य असे चमत्कार होत; तथापि चमत्काराशिवाय नमस्कार नसल्याने, मनुष्यप्राण्यातला अहंभाव दमन करण्याचे ते मोठे अस्त्र होते. श्री साईबाबांच्या या सर्व कृतीमागील तार्किक भूमिका पाहू लागल्यास, श्रद्धा आणि निष्ठा यांची कास धरल्यास मानवी जीवनाचे साफल्य वृद्धिंगत होईल हे निःसंशय खरे आहे.

श्रीसाईबाबांचे अवतार कार्य सुरू असतांना आणि अवतार कार्याचे महा निर्वाण झाल्यानंतरही 'साईकृपेच्या लीला' भक्तांना एका अगम्य विश्वात नेऊन स्तिमित करतात. कारण श्रद्धा, निष्ठा आणि सबुरी ह्या त्रिसूत्रीच्या आधारे आपल्या भक्तांवर श्रीसाई सदैव कृपेची पाखर घालतात. "मी माझिया भक्तांचा अंकिला । आहे पासीच उभा ठाकला । प्रेमाचा मी सदा भुकेला । हांक हांकेला देतसे" या साईंच्या आश्वासित वचनानुसार, भक्तांच्या मनोकामनेचाही भार आपल्या खांद्यावर उचलण्यास परम कृपाळू श्री साईनाथ कसे तयार असतात त्याचा विलक्षण अनुभव मला आहे —

मी एल. एल. बी. च्या परीक्षेस म्हणून ४० दिवसांची रजा घेतली होती. तोपर्यंत अभ्यासाच्या दृष्टीने माझी पाटी कोरीच होती. रजा घेतली परंतु माझ्या अभ्यासाला मुहूर्त काही सापडला नाही, आणि अनिवार्य अशी एक एक प्रापंचिक कामे आली की, त्यामध्ये माझी सगळी रजा जवळ जवळ संपत आली, आणि फक्त बारा दिवस परीक्षेला उरले होते. म्हणजे एका विषयाला दोन दिवस देणे एवढे गणित करणे हेच माझ्या हाती होते व त्याचा निकाल देखील 'नापास' हा ठरलेला होता. अशा परिस्थितीत परीक्षेला बसणे इष्ट नव्हते आणि आणखी बारा दिवस रजा फुकट जाऊ नये म्हणून दुसऱ्या दिवशी कामावर जाण्याचे ठरविले.

अशा मनःस्थितीत असता अचानक काय झाले कुणास ठाऊक . . . मी बाबांच्या तसबिरी समोर उभा राहिलो. अनन्यभावे शरण जाऊन बाबांना म्हटले, "बाबा, मी परीक्षेला बसतो. या बारा दिवसात मला अशी स्मरणशक्ति द्या की मी जे जे वाचीन ते ते परीक्षेत उत्तरपत्रिकेमध्ये उतरविण्याची विलक्षण शक्ति माझ्या अंगी निर्माण करा, आणि त्या बारा दिवसात मी रात्रंदिवस अभ्यास केला आणि आश्चर्य म्हणजे मी दुसरा वर्ग मिळवून पास झालो.

भक्ताच्या प्रेमाखातर दयाघन श्रीसाई भक्ताची इच्छा फलद्रूप होण्यासाठी वैश्विक नियंत्रण करत असतील ते अनाकलनीयच होय म्हणून,

**कायां, वाचा, मने स्मरावे साईनाथ**
**आनंदे गावे गीत साईनाथ साईनाथ ।**

★

# साई कृपाळूपणे भक्त जनांसी तारी

**********************

—सौ. सुशीला म. शेवडे.
जुना म्युनिसिपल दवाखाना
क्वार्टर्स, लोणावळा.

० माझा भाऊ राहुरीला होता, म्हणून आम्ही राहुरीला भावाकडे गेलो व जवळचे प्रसिद्ध ठिकाण शिरडी पाहण्याचे ठरविले. तेथे जाताच तेथील वातावरणाचा व साईबाबांचे वचनांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. 'माझ्या समाधीची पायरी चढेल, दुःख हे हरेल सर्व त्याचे' हे वचन डोळ्यासमोर आले, आणि मी मनात म्हणाले 'माझा कान ऑपरेशन करूनही वहात आहे', तो थांबला तर तुमच्या पादुका पूजेत ठेवीन'. दोन महिन्यातच माझा कान रोज वहात होता तो थांबला. तेव्हांपासून मी त्यांच्या पादुका पूजते.

माझ्या मुलाला मुलगा झाला म्हणून त्याला घेऊन मी शिरडीस गेले. त्यावेळी मी बाबांना म्हणाले, 'माझ्या मुलीच्या लग्नाला ३ वर्षे झाली, आता तिला मुलगा झाला की त्यालाही दर्शनास घेऊन येईन' बाबांनी माझ्या मनातली तीव्र इच्छा जाणली आणि काय – १। वर्षात मुलीला मुलगा झाला.

माझी साईबाबांवरची भक्ती वाढतच गेली, आणि त्यांनी माझी परीक्षा पाहिली का? असा विचार त्या भयंकर प्रसंगी मनात चमकून गेला. तो प्रसंग असा, माझ्या मिस्टरना बराच अशक्तपणा वाटू लागला. म्हणून फॅमिली डॉक्टरना दाखविले, डॉक्टरनी त्यांची लघवी तपासली. युरिनमध्ये साखरेचे प्रमाण जास्त आढळले. म्हणून डॉक्टरनी जेवणापूर्वी सकाळ, संध्याकाळ गोळ्या घेण्यास दिल्या २ महिने गोळ्या घेतल्या, अशक्तपणा वाढतच होता. एक दिवस पायाला काही कारणाने जखम होऊन टाके पडले. जखम चिघळू नये म्हणून त्यांनी पथ्यही सुरू केले आणि तिसरेच दिवशी रात्री २ च्या सुमारास ते हातपाय वाकडे करू लागले व डोळे फिरवू लागले. मी हाक मारली तर 'ओ' पण म्हणेनात घरात मी एकटीच असल्याने घाबरून गेले व दार उघडून शेजाऱ्यांना हाका मारल्या. त्यांनी डॉक्टरना बोलावून आणले. डॉक्टरनी मिस्टरना तपासले व त्यांना कॉफी पाजण्यास सांगितले मी चमच्याने थेंब थेंब कॉफी

पाजली. नंतर डॉक्टरनी त्यांना हाक मारल्यावर 'हं' म्हणाले तेव्हां डॉक्टर निघून गेले. पुन्हा २ तासाने चहा (साखरेचा) पाजण्यास सांगितले. २ तास हे निपचित पडून होते. पण शुद्ध नव्हती. अंथरूणातच लघवी झाली. मी २ तासाने कपडे बदलून चहा घातला. पुन्हा निपचित पडले. सकाळी पुन्हां हातपाय वाकडे करून डोळे फिरवू लागले. अंथरूणावरून बाजूला होऊ लागले. शेजाऱ्यांनी पुन्हा डॉक्टरना बोलाविले. डॉक्टर येईपर्यंत ९ वाजले. मुलगा व मुलगी पर-गावी राहात असल्याने मी फारच घाबरले. डॉक्टर आले. त्यांनी तपासले व म्हणाले ह्यांना 'कोमा' झाला आहे. ताबडतोब पुण्याला न्या.' पण जणू काही पूज्य बाबांनी शेजाऱ्यांना प्रेरणा दिल्याने त्यांनी टॅक्सी आणून त्यातून माझ्या मिस्टरना म्युनिसिपल हॉस्पिटलमध्ये नेले. त्यावेळी माझ्या डोळ्यासमोर आले फक्त साईबाबा. मी बाबांना म्हणाले, "बाबा मुलीचे सौभाग्य अखंड राखा, उभयता दर्शनास येऊ." आणि काय आश्चर्य, दवाखान्यात नेऊन ग्लुकोज भरताच १५ मिनिटात हे शुद्धिवर येऊन उठून बसले. नंतर सर्व तपासणीसाठी पुण्यास नेले. तेथे असे आढळले 'डायबेटिस' नसून पचनशक्ती बिघडली आहे. आता ह्यांची तब्येत उत्तम होत आहे ही साईकृपाच.

★

## काळाच्या दाढेतून निज भक्ता मी ओढीन

**—सौ. मेघना अरुणराव कोलवाडकर**
द्वारा – मोटघरे यांचा बंगला,
रेडरोज कॉनव्हेंट लाईन, गिरीपेठ,
नागपूर. १०.

० प्रसूतीकाळ हा प्रत्येक स्त्रीच्या पुनर्जिवनाचाच काळ असतो. प्रत्येकीला निरनिराळे अनुभव येत असतात. पण माझ्या चिरस्मरणीय अनुभवाचा दाखला देण्याची माझी तीव्र इच्छा आहे व त्यानुसार साईलीलेत हा छोटासा अनुभव देत आहे.

११ जानेवारी १९८३ माझ्या लक्षात राहण्यासारखा दिवस आहे. शनिवारी ८ जानेवारीला सकाळीच तज्ञ डॉक्टरांच्या इस्पितळात मी भरती झाले. आज होणार, उद्या होणार असे करता करता मंगळवार दि. ११ जानेवारी पर्यंत मला व डॉक्टरांना माझी प्रसूती केव्हां होणार याची वाट बघावी लागली. सर्व परिस्थिती अगदी नॉर्मल असताना कुठे अडते हे कुणाच्याही लक्षात येईना त्यातून माझे परमपूज्य पित्यांचे छत्रही ढासळलेले. माझ्या मोठ्या दोन भावजया गुरुमाऊल्याच जणू या माझ्या सेवेसी हजर होत्या. दोघीही साईभक्त. माझही लाडके आराध्य दैवत साईबाबाच. माझे यजमान कट्टर विष्णूभक्त. अशा पुण्यवान लोकांचे सहकार्य मला होते. परंतु दोन दिवसांनी मात्र माझ्या वहिनी सौ. मंगला व सौ. सुलोचना अगदी हताश झाल्या सोमवारचाही दिवस उजाडला.

सोमवार दि. १० ला मला पेन्सचे इंजेक्शन एकदाच नव्हे तर दोनदा देण्यात आले. पण व्यर्थ! पेन्स तर दूरच उलट मला शांत झोप लागली. उठल्यानंतर मात्र मीही खूप चिडले, व असे का व्हावे! माझ्या वडिलांचा धावा व साईबाबांचा धावा अखंड सुरू ठेवला. साईबाबांशी तर मी बोललेच हे साईबाबा – काळाच्याही दाढेतून निज भक्ता मी ओढीन हे चरण वारंवार म्हणू लागले.. सारखा १ तास असा प्रसंग सुरू असल्याचे मला आठवते! त्या-नंतर मात्र सोमवारची मध्यरात्र मला कॅस्ट्रॉइलची बाटली पूर्ण घेण्यास सांगि-तली व ऑपरेशनची संभावना आहे असा माझा अंदाज झाला. पण माझे साई माझा पूर्ण भार माझ्या लहानपणा पासूनच चालवित असतांना असा प्रसंग येणार नाहीं याची मला पूर्ण खात्री होती. पण भोग भोगल्याशिवाय सुटका नाही असे म्हणतात. मंगळवारी ११ जानेवारीला मात्र सर्व देवता माझ्या मदतीला धावून आल्या व डॉक्टरांच्या हस्ते नॉर्मल डिलीव्हरीतून मला सुखरूप वाचविले व कन्यारत्न जन्माला आले. अशी ही अघटीत घटना साईलीलेत द्यावीच असा चंग मी बांधला. आज माझी मुलगी १ वर्षाची झाली. मोठा मुलगाही ५ वर्षाचा आहे असा आमच्या छोट्याशा कुटुंबाचा भार अखंडीतपणे श्री साईबाबांनीच वहावा हो नम्र प्रार्थना.

विलेपारले येथील साईभक्त

# श्री जगन्नाथराव भिडे काका

० विलेपारले मुंबई येथे एक वयोवृद्ध सज्जन साईभक्त रहातात. त्यांच्या निवासस्थानाचे नाव आहे देवेंद्रव्हिला. पार्लेस्टेशनवर उतरून पूर्वेला आले की महंत रोडवर तळमजल्यालाच या साईभक्ताचा निवास आहे त्यांचे नाव आहे, श्री. जगन्नाथ गजानन भिडे. ७६ वर्षांचे हे सद्गृहस्थ दिवसभर साई सेवेत रममाण असतात. त्यांच्या पत्नी सौ. चंद्रिकाबाई या पण आपल्या पती बरोबरच बाबांची भक्ती व गुणगान सदोदित करीत असतात. या उभयतांच्या भक्तीचे फळ म्हणूनच की काय साक्षात् बाबांचा वास त्यांचे घरी असल्याचा भास होतो.

त्यांच्या घरात शिरताच दरवाजा समोरच श्री बाबांची अत्यंत सुंदर, हसमुख नयनमनोहर सालंकृत अशी प्रतिमा नजरेला पडते. या प्रतिमे सभोवती विजेच्या रंगीबेरंगी दिव्यांची आरास केलेली आहे. बटन दाबले की या सजावटीत, आराशीत आणखीनच भर पडते व तसबिर आणखीन तेजाने उजळून निघते. या प्रतिमे भोवतालच्या देव्हाऱ्यातही बाबांच्या छोटया छोटया प्रतिमा आहेत, चित्रे आहेत.

संकटात, अडीअडचणीत सापडलेल्याना भिडेकाका नेहमीच मार्गदर्शन करीत आलेले आहेत. लग्नाचा घोळ निर्माण झालेल्या तरुण मुला–मुलींना किंवा त्यांच्या आप्त–नातलगांना त्यांचा सल्ला बहुमोल वाटत असतो. आजारी दुखणाईतांना तर त्यांचेकडून नेलेले तीर्थ व उदी हमखास गुणकारी ठरलेले आहे.

श्री. भिडे आज पार्ल्यात रहात असले तरी एका वेळी ते गिरगावात रहात असत. १२ सप्टेंबर १९०८ हा त्यांचा जन्मदिवस त्यांचे वडिल कस्टम अधिकारी होते. भिडेकाकांचे शिक्षण गिरगावातील आर्यन एज्युकेशन सोसायटीचे शाळेत मॅट्रीक पर्यंत झाले. नंतर त्यांनी कंपौंडरींगचे शिक्षण घेतले. अंधेरीला डॉ. पाटील यांचेकडे ते नोकरीस राहिले. पुढे डॉ. वसंतराव अवसरे यांचेकडे ते चांगली ४० वर्षे कंपौंडर म्हणून नोकरीस होते.

श्री. भिडेकाकांच्या वडीलांनी श्री साईनाथांचे दर्शन घेतलेले होते. आपल्या वडीलांच्या शिकवणूकीनेच की काय बाबांची मनोभावे पूजाअर्चा जे ते करू

लागले आहेत ते अगदी आजतागायत. पारल्याला आल्यापासून ते बाबांच्या बरोबरच पार्लेश्वर मंदिरातील श्री शंकराचीही भावभक्ति करीत असतात. ते रोज भल्या पहाटे उठतात व थंड पाण्याने स्नान करून पार्लेश्वराचे दर्शन करतात त्यानंतर घरी येऊन श्री बाबांची यथाविधि पूजा अर्चा करतात. बाबांना मोठ्या प्रेमाने हाक मारतात बाबांना नैवेद्य दाखवतात व मगच आपण प्रसाद भोजन करतात. दिवसभर बाबांच्या प्रतिमेसमोर बसून, त्या प्रतिमेकडे सारखे सारखे बघूनच की काय एक प्रकारचे आत्मिक सामर्थ्य, बल त्यांना प्राप्त झालेले आहे, व त्यामुळे त्यांच्या हातून मिळणाऱ्या ऊदी-तीर्थाला व त्यांच्या संभाषणाद्वारे प्राप्त होणाऱ्या वाक्याला यशसिद्धि मिळत आहे असे अनेकांचे सांगणे आहे.

श्री. भिडेकाकांची श्री बाबांच्या वरील श्रद्धा व भक्तीभाव असाच वाढता राहो ही शुभेच्छा.

★

## डॉ. यु. टी. बल्लाळ यांचे सुयश

सांताक्रूझ येथील एक साईभक्त डॉ. यु. टी. बल्लाळ हे पायांतील पावलांचे विविध प्रकारच्या दुखण्यावर खात्रीशीर इलाज करण्यात यशस्वी झालेले आहेत. कुरूप, भोवऱ्या, चिखल्या, टाचेत पडणाऱ्या भेगा व त्यामुळेच उद्भवणारे गुडघे, कंबरदुखी, मधुमेह इ. विकारांवर यशस्वी गुणकारी उपाय ते करतात. त्याबद्दल त्यांना माजी राज्यपालांच्या पत्नी श्रीमती शांती सादिक अली व इतर नामवंतांनी शिफारसपत्रे दिली आहेत. श्रीबाबांच्या वरील भक्ती, श्रद्धा, व सबुरी मुळेच आपण हे यत्न आता यशस्वीपणे करू शकतो असे श्री. बल्लाळ यांचे म्हणणे आहे. संपर्क :– डॉ. यु. टी. बल्लाळ, जी–२३ कुमार सोसायटी, नेहरू रोड, मु. पो. सांताक्रूझ, (पूर्व), मुंबई ४०० ०५५. दूरध्वनी क्रमांक – ६१२७७७५.

# अ. भा. साईभक्त लेखक–कवि स्नेहसंमेलन
# नवापूरात साईनगर श्रद्धापूर बनले

या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाचे एक श्रद्धास्थान असते. सारी मानव जात जेथे नतमस्तक होते. अशा श्रद्धेय स्थानाला जातपात, धर्म यांचे बंधन नसते. कुणीतरी आपल्या पावलांवर लक्ष ठेवणारा आहे याची हरघडी जाणीव होत असते, आणि म्हणून सुखदुःखात अडकलेल्या माणसाला क्षणभर मुक्त आनंद मिळावा, साईप्रेमी एकत्र यावे, परस्परातील स्नेह वाढावा यासाठी साई-भक्तांनी संमेलन आयोजित केल्याचे संयोजक कवि रमेश डी. चव्हाण यांनी सांगितले. हे संमेलन १२ व १३ मे रोजी नवापूर येथील सार्वजनिक हायस्कूल-मध्ये आयोजित केले होते तर निवासाची अप्रतिम व्यवस्था जयहिंद छात्रालया-च्या आवारातील खास तयार करण्यात आलेल्या साईनगरात करण्यात आली होती.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी धुळयाचे श्री. वसंतराव पिंगळे होते. कविवर्य नागेश मोगलाईकर यांचे ईशस्तवनानंतर कार्यक्रमाला सुरूवात झाली. सुरूवातीस वसंतराव पिंगळे यांनी दिप प्रज्वलित केल्यानंतर मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. अ. ध. वसावे यांचे हस्ते साईप्रतिमेचे अनावरण करण्यात आले. प्रास्ता-विक व स्वागत कवी रमेश चव्हाण यांनी केले तर सत्कारार्थींचा परिचय जगदीश देवपूरकर यांनी आगळया-वेगळया शैलीत करून दिला. याप्रसंगी रामदास चव्हाण, डॉ. सुमतीताई खानविलकर, डॉ. इंदुताई नाईक, विजय हजारे नागेश मोगलाईकर, प्रा. रसिकलाल दोशी, अनिलभाई शहा, डॉ. डी. के. सोनार, भैय्या उपासनी, लीलाताई मराठे वसंत साने आदींची भाषणे झाली.

**परिसंवाद गाजला :**

स्नेहसंमेलनानिमित्त 'आज साईबाबा असते तर' व 'आजच्या जगात श्रद्धेचे महत्त्व' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाचे सूत्रसंचालन लोणावळयाच्या डॉ. इंदुताई नाईक यांनी उत्कृष्टपणे केले. प्रत्येक वक्त्याने आपली बाजू समर्थपणे मांडली या परिसंवादातील कु. राहुल खानविल-करने आपले विचार लहान असूनही चांगले मांडले. तो म्हणाला, "साईबाबा असते तर खूप आनंद झाला असता भक्तीजीवी म्हणून शाबासकी मिळविली

असती." परिसंवादात विजय हजारे, मधुकर अंबाडे, प्रा. रसिकलाल दोशी, कवि शिवदत्त, नागेश मोगलाईकर, पी. टी. खैरनार, डॉ. सुमतीताई खानविलकर, डॉ. डी. के. सोनार, हसमुख पाटील, नामदेव पाटील, अनिलभाई शाह, प्र. अ. पुराणिक, भैय्या उपासनी, राहुल खानविलकर इत्यादींनी भाग घेतला.

**भक्तीगीतांचा कार्यक्रम :**

पहिल्या दिवसाच्या तृतीय सत्रात अनिलभाई शाह व सहकाऱ्यांनी भक्तीगीतांचा सुंदर कार्यक्रम सादर केला. त्यांनी हिंदी, मराठी व गुजराथी भाषांतून गीते गाईली. त्यांच्या भक्तीगीतांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले. त्यामुळे सगळे वातावरण श्रद्धामय झाले.

**भैय्या उपासनींचे कथाकथन रंगले :**

एकीकडे स्नेहसंमेलनातून भक्तीरस वहात असतांना शृंगार विनोदातूनही भक्ती साधता येते हे संमेलनाचे आकर्षण ठरलेल्या भैय्या उपासनींनी सुरूवातीसच स्पष्ट करून साईभक्तांना अक्षरश: हास्यात गोवले. त्यांनी प्रा. विठ्ठल वाघ यांच्या 'पालखी' व 'बिल्लोर' तसेच वि. वा. शिरवाडकरांची 'प्रेम कुणावरही करावं' या कविता अत्यंत खुमासदार शैलीत सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली. त्यानंतर भैय्यानें स्वत: लिहिलेली "माझ्या गावच्या रीतीभाती' ही कथा सांगितली. त्यांच्या आगळ्यावेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण शैलीने प्रेक्षक बेहद खूष झाले. कथेची कल्पना वेगळीच असल्याने व कथाकथनाची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे कार्यक्रम श्रवणीय झाला.

**बहारदार काव्यवाचन :**

हे अ. भा. साईभक्त लेखक–कवी संमेलन भारताच्या विविध भागातून आलेल्या कविंनी गाजविले. प्रत्येक कवी आपापल्या कवितेतून श्रद्धा व सबुरीचं महत्त्व स्पष्ट करीत होता. प्रत्येकाच्या काव्यातून भक्तीरस ओसंडून वाहात होता. साईबाबा आम जनतेची संपत्ती आहे, जगात सध्या गैरवर्तन वाढते आहे त्या विषयी चीड, शिरडीला जाण्याचा आगळावेगळा आनंद, साईचे आकलन न होणे, साई कुबेराचे धन आहे, प्रत्येक साईभक्त आपापल्या देवाला साईच्या रूपात पहातो, अशा प्रकारचे संदर्भ असलेल्या विविध प्रकारच्या कविता कविंनी म्हणून दाखविल्या.

काव्य वाचनात सर्वश्री प्रमोद शिरसाठ, प्रमोद ओझरकर, दिनेश बोरसे, मोहन सोनवणे, पितांबर खैरनार, बाळासाहेब नाडकर्णी, अरुण जोहरी, रमेश भाट, अरुण सोनवणे, के. एन. साळुंखे, प्रविण थोरात, मधुकर अंबाडे, राहुल खानविलकर, संजय परळकर, जगदीश देवपूरकर, डी. बी. जगत्पुरीया, डी. बी. पोतनीस, कवि शिवदत्त, अशोक खानविलकर, विजय हजारे, नागेश मोगलाईकर, प्र. अ. पुराणिक, डॉ. इंद्रताई नाईक, एकनाथ सोनवणे, बी. पी. राजपूत, दि. शं. भामरे, हसमुख पाटील, रमेश चव्हाण, सौ. सिंधु सणस, अनिल पंडित, दै. मतदाराचे वसंत साने, उज्वला घावरे, नामदेव पाटील, मधुकर खैरनार इत्यादि कवींनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमतीताई खानविलकर व विजय हजारे यांनी केले.

**उज्वलचे प्रकाशन :**

काव्यवाचन कार्यक्रमानंतर मोहन सोनवणे (नवागाव) यांनी संपादित केलेल्या "उज्वल" त्रैमासिकाचे प्रकाशन श्री. वसंतराव पिंगळे यांचे शुभहस्ते करण्यात आले तर हसमुख पाटील यांच्या 'साईबावनी' चे प्रकाशन भैय्या उपासनी यांचे हस्ते झाले. खास नवोदितांसाठी सुरू झालेल्या 'उज्वल" चा उत्कर्ष व्हावा अशी आशा अनेकांनी व्यक्त केली. उज्वल प्रकाशना नंतर मधु जोशी यांनी 'टरटर' सादर करून उपस्थितांचे मनोरंजन केले.

**कै. ताराई स्मृती काव्यस्पर्धा :**

संमेलनानिमित्ताने कै. ताराई चेंदवणकर स्मृती काव्यस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कवितेसाठी 'साई माझा सखा । नसे मज धोका ॥ ह्या ओळी देण्यात आल्या होत्या. स्पर्धेत शंभरावर कवींनी भाग घेतला होता. स्पर्धेसाठी परिक्षकाचे काम डॉ. इंद्रताई नाईक, डॉ. सुमतीताई खानविलकर, नागेश मोगलाईकर, जगदीश देवपूरकर, रमेश चव्हाण, विजय हजारे आदींनी पाहिले.

या स्पर्धेत कर्नाटकचे सुप्रसिद्ध कवि प्रा. गुंडेराव पटवारी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला तर गुजरात राज्यातील बडोदा येथील कवि मधुकर अंबाडे द्वितीय पारितोषिकाचे मानकरी ठरले. तृतीय पारितोषिक मात्र महाराष्ट्रातील धुळ्याचे कवि दि. शं. भामरे यांनी पटकाविले. डी. बी. पोतनीस (पुणे) व

के. एन. साळुंखे (निमगूळ) यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली तर रमाकांत पंडित यांचे तर्फे अरुण सोनवणे यांना वैयक्तिक बक्षिस देण्यात आले. विशेष पारितोषिक कु. राहुल खानचिलकर यास देण्यात आले.

यशस्वी स्पर्धकांना कै. बाळासाहेब नाशिककर स्मृती ढाल व चषक वसंतराव पिंगळे यांचे हस्ते देण्यात आले. स्नेहसंमेलनाचे सूत्रधार श्री. रमेश चव्हाण व सौ. कुसुम चव्हाण या उभयतांचा यावेळी सत्कार करण्यात आला. विविध भागातून आलेल्या कवि-लेखकांना स्मृतीचिन्हे भेट देण्यात आली. वसंतराव पिंगळे यांचे अध्यक्षीय भाषणानंतर कविवर्य नागेश मोगलाईकर यांनी निरोप गीत म्हटले. मॅन ऑफ दी संमेलन भैय्या उपासनींना समई भेट देण्यात आली. दोन्ही दिवसांच्या संपूर्ण कार्यक्रमांचे संचलन जगदीश देवपूरकर ने वैशिष्टपूर्ण शैलीत करून तो सगळयांच्या लक्षात राहिला. तर संजय देवपूरकरने साईबाबांचे अप्रतिम चित्र रेखाटून सर्वांची वाहवा मिळविली.

**अशी होती साईनगरी :**

संमेलनासाठी "साईनगर" तयार करण्यात आले होते. साईनगरात सर्व-प्रकारच्या प्राथमिक सोयींची उपलब्धता होती. साईनगरातील लेखक कविंच्या निवासांना शामा निवास, तात्या कोते निवास, काकासाहेब दीक्षित निवास, काशिराम शिंपी निवास, म्हाळसापती निवास, बायजाबाई निवास, राधाकृष्णआई निवास, लक्ष्मीबाई निवास, भागोजी शिंदे निवास, नानासाहेब चांदोरकर निवास दासगणू निवास, गोपाळराव बुटी निवास, हेमाडपंत निवास इत्यादी साईभक्तांची नावे दिली होती. कार्यक्रमाचा हॉल निवासाची जागा विजेच्या रोषणाईने पताका बांधून भव्य मंडप टाकून सजविण्यात आली होती.

या संमेलनासाठी अनेकांचे शुभसंदेश आले होते. खरोखरीच नवापूरात सगळीकडे एकूण श्रद्धेचे वातावरण दिसून येत होते. त्यामुळे "श्रद्धापूर" आहे असे वाटत होते, अशा प्रकारे संमेलन हे अभिनव प्रकारचे संमेलन ठरले.

**प्रगती पथावर नवापूर :**

नवापूर शहर सांस्कृतिक कार्यक्रमातून नेहमीच आघाडीवर असते. दिवसें-दिवस सांस्कृतिक कार्यक्रमही वाढताहेत. त्यात ह्या संमेलनाने मोलाची भर

टाकली आहे. येथील उत्साही लेखक कवि मंडळींनी व रसिकांनी पार पाडलेले हे संमेलन म्हणजे एक धाडसी व कौतुकास्पद अभिनंदनीय पाऊल आहे. अशा कार्यक्रमातूनच ह्या भागातील नागरिकांची कला जोपासली जाईल. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलू लागेल व राहणीमानातही योग्यरित्या बदल घडून येईल अशी अपेक्षा आहे. कारण या व यासारख्याच गोष्टींसाठी या सांस्कृतिक कार्यक्रमांची गरज भासू लागली आहे.

**उत्साही कार्यकर्त्यांची फौज :**

कार्यक्रमाच्या रूपरेषेनुसार कार्यक्रम यशस्वीरित्या व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हे संमेलन यशस्वीरित्या व रूपरेषेनुसार होण्यासाठी पदाधिकाऱ्यासह डॉ. इंदू नाईक, बाबा शामकुमार, एकनाथ सोनवणे, डी. बी. जगत्पुरिया, सौ. लीला मराठे, दिपक सोलंकी, एन. एस. पाटील, गोविंदभाई पटेल, एस. एस. महाले, दत्तात्रय चव्हाण, डॉ. सुमतीताई खानविलकर, प्रमोद शिरसाठ, विजय हजारे, मोहन सोनवणे, पारस देवपूरकर, संजय देवपूरकर, प्र. अ. पुराणिक, नामदेव पाटील, रवि ऋषि, वसंत साने, रामदास चव्हाण, रमेश चव्हाण, सौ. कुसुम चव्हाण, भानुदास चव्हाण, विजय चव्हाण, जगन्नाथ चौधरी, हसमुख पाटील, पी. टी. खैरनार, मनोहर चव्हाण, पुनाभाई पटेल ही सर्व मंडळी उत्साहाने खपत होती.

साईबाबांवर श्रद्धा असणारे असंख्य भक्त या देशात आहेत. महाराष्ट्रात इतरांच्या मानाने अधिक आहेत. मोठ्या संख्येने लेखक–कवि एकत्र येत आहेत ही आनंदाची बाब आहे. असे अभिनव उपक्रम रमेश चव्हाण यशस्वी राबवितात म्हणून अनेकांनी मनापासून कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

৪৪ ৪৪

---

## माणिक – सावंत शुभविवाह

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर, मुंबई कचेरीतील श्री. तुकाराम गोपीनाथ माणिक यांचा शुभविवाह चि. सौ. कां. दिपलक्ष्मी (श्री. श्रीकृष्ण सावंत, मु. सड्यामिरी, रत्नागिरी यांची कन्या) इजबरोबर शुक्रवार ता. १–६–८४ रोजी इंद्रप्रस्थ सभागृह विठ्ठल मंदिर राजापूर येथे थाटाने साजरा झाला. वधूवरांचे मनःपूर्वक अभिनंदन.

# शिरडीवृत्त माहे एप्रिल १९८४

## रामनवमी उत्सव कार्यक्रम

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज शिरडी, यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे सोमवार दि. ९ एप्रिल ८४ ते बुधवार दि. ११ एप्रिल १९८४ पर्यंत ३ दिवस साजरा झाला. दिवसेंदिवस श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात वाढत असल्यामुळे उत्सवात कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये म्हणून संस्थानचे मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांनी उत्सवाचे तयारीसाठी सर्व खातेप्रमुखांची सभा एक महिना अगोदर घेऊन सर्व कामांचा व खर्चाचा विचार-विनिमय केला व कामाची योजना आखून दिल्याप्रमाणे मांडवाचे काम, पाणपोई, संरक्षण, साफसफाई, दिवाबत्ती लाऊडस्पीकर, कलाकारांची हजेरी, सनई चौघडा, वाजंत्री, अन्नदान वगैरेची व्यवस्था ठेवणेत आली होती.

### उत्सवाचा पहिला दिवस :–

सोमवार दि. ९–४–८४ रोजी नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे श्रींच्या द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर झाल्यावर श्री साईसच्चरित अध्याय वाचनास सुरवात झाली. दुपारी ४–३० ते ६–३० पर्यंत ह. भ. प. श्री. छगन महाराज, गोरटा आश्रम जि. नांदेड यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७–३० ते ९–०० व ९–३० ते ११–०० पर्यंत सौ. सुनंदा जोग (आपटे) रेडिओस्टार, पुणे यांचे गायन झाले. रात्रौ ०९–१५ ते ११–०० पर्यंत श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक काढणेत आली. स्थानिक लोकांनी व भक्त मंडळींनी मिरवणुकीचे वेळी गारुड–भारूड कार्यक्रम केले. श्री. रघुनाथ सांडभोर पुणे, सिनेकलाकार यांचा भारूड कार्यक्रम झाला. त्यानंतर वाद्यांचे गजरात श्रींची पालखी मिरवणूक समाधी मंदिरात आली व शेजारती झाली.

### उत्सवाचा मुख्य दिवस :–

मंगळवार, १०–४–८४ रोजी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने पहाटे पासूनच श्रींचे दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. नित्य कार्यक्रमा

व्यतिरिक्त सकाळी ६ वाजता श्रींच्या फोटोची व साईसच्चरित ग्रंथ वाचन समाप्तीची मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणूकीचा मोठा कार्यक्रम झाला. शिरडी गावातील भाविक मंडळी व साईभक्त कोपरगाव मुक्कामी रात्री जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन ९ मैल पायी चालत आले. सकाळी ६–३० वाजता मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी कावडीची पूजा केल्यावर अंदाजे एक हजार कावडींची मिरवणूक वाजत–गाजत गावातून निघाली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधीस स्नान घातले.

सकाळी १०–३० ते १२–३० पर्यंत ह. भ. प. श्री. मनोहर वासुदेव कोकलेगावकर उर्फ मनु महाराज यांचे रामजन्म आख्यान–कीर्तन झाले. सायंकाळी ४–०० वा. निशाणाची व ४–४५ वा. श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघाली. रात्रौ ९ ते १०–०० डॉ. मा. चिं. दिक्षित, पुणे यांचा साईरामायण कार्यक्रम झाला. रात्रौ १० ते सकाळी ६–०० पर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्रभर खुले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस :–**

बुधवार दि. ११ एप्रिल ८४, नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त ह. भ. प. मनू महाराज (नांदेड), यांचे गोपाळकाला कीर्तन सकाळी ११–३० ते १२–३० पर्यंत झाले. दहीहंडी माध्यान्ह आरती झाल्यानंतर तीर्थप्रसाद वाटणेत आला. रात्रौ ७–३० ते १०–०० प्रख्यात भजन गझल गायक श्री. अनुप जलोटा, मुंबई यांचे सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ १० वाजता शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाहीं.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन** :– (१) ह. भ. प. जाधव गुरुजी.
(२) ह. भ. प. श्री. मनोहर वासुदेव कोकलेगावकर उर्फ मनु महाराज, नांदेड.

(३) ह. भ. प. छगन मारोती बारटक्ते, गोरटा.
(४) ह. भ. प. श्रीमती सौ. ताराबाई लोखंडे, नागपूर.

**प्रवचन :–** (१) ह. भ. प. मुरलीधर महाराज देशमुख, शिरडी.
(२) ह. भ. प. श्री. विश्वनाथ महाराज सुराळेकर, वैजापूर
(३) ह. भ. प. श्री. लक्ष्मण चितळे, लोणावळे.

**भजन, गायन, वादन, नृत्य, नकला वगैरे :–** (१) श्री. शाहूराम भोसले, भायखळा. (२) कु. चंद्रकांत विष्णू गोडे. (३) श्री. रतनलालजी शर्मा, नागपूर. (४) श्री. बाबूराव रूंजा पवार. येरंडगाव. (५) सौ. विद्या गणपतराव पालव, मुलुंड. (६) श्री. गोपाळ चौरसीया, कलकत्ता. (७) श्री. नन्हेबाबू कुँवर, बिदर. (८) आशाकुमारी चव्हाण, बिदर. (९) श्री. करसनलाल त्र्यंबक भावसार, मालेगाव. (१०) श्री. सी. सुधाकर हैद्राबाद. (११) श्री. श्रीराम विष्णू सातर्डेकर, परेल. (१२) श्री. डॉ. कीर्तीकर, मुंबई. (१३) सौ. सुनंदा जोग (आपटे) मुंबई. (१४) श्री. सुरेश आपटे, पुणे. (१५) श्री. करसनलाल त्र्यंबक भावसार, मालेगाव. (१६) डॉ. माधव चिंतामण दिक्षित, पुणे. (१७) संजय माधव दिक्षित. (१८) श्री. प्रसाद विश्वनाथ लोटा, पिंपरी. (१९) श्री. शांतीलाल पारकर्णी, पुणे. (२०) श्री. दिपक शरद गांगल, पुणे. (२१) अलारेखा, पुणे. (२२) श्री. श्रीराम दैठणकर, पुणे. (२३) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. (२४) श्री. पारसमल पोरवाल, शिरडी. (२५) श्री. विजय यशवंत सहामते, चिचनेर. (२६) श्री. रघुवीर शांताराम मिराणे, शिरडी. (२७) सौ. गिजरेबाई, शिरडी. (२८) श्री. रामाचारी हैद्राबाद. (२९) श्री. भोरले साईदास, मुंबई (३०) श्री. बाळाराम पवार मुंबई. (३१) श्री. अरुण देवनकर, मुंबई. (३२) श्री. दिगंबर उद्धव भातोडे, राहाता. (३३) श्री. राम धनावडे, मुंबई. (३४) श्री. रविंद्र शरमानकर, मुंबई. (३५) श्री. दौलत शर्मा, मुंबई. (३६) श्री. मिलन पितळे, मुंबई. (३७) श्री. सुरेशकुमार नटवर विसपुते, शिरडी. (३८) श्री. नामदेव नागू भोईर, रायगड. (३९) श्री. महाडेकर, मुंबई. (४०) श्री. नंदकिशोर पुरोहित, मुंबई. (४१) श्री. सोमनाथ परब, मुंबई. (४२) श्री. ललितकुमार जोशी, शिरडी. (४३) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी. (४४) श्री. हरकचंद रतनचंद, मालेगांव. (४५) श्रीमती मनीबाई मद्रासी, शिरडी. (४६) श्री.

सुधाकर नारायण कामतेकर, वडाळा. (४७) श्रीमती लीलावती गुजराथी, शिरडी. (४८) श्री. संजय परळकर, दादर. (४९) श्री. वसंत घुमकर, मुंबई. (५०) श्री. महेश राणे, मालवण. (५१) श्री. प्रमोद सावंत, मुंबई. (५२) श्री. सुरेश राणे, मुंबई. (५३) श्री. मुरलीधर लक्ष्मण रत्नागिरी. (५४) श्री. शेख नबाब उमर पटेल, अस्तगाव. (५५) श्री. जे. एस. चौरसी, भिलाई. (५६) श्री. गीताराम अनर्थी, वैजापूर. (५७) पंडीत रहिम पेटीवाला वैजापूर. (५८) श्री. रामचंद्र अनंतराव पवार, सातारा. (५९) श्रीमती छबूबाई लाखे, कऱ्हाड. (६०) श्री. मुरलीधर बाळाराम बोरगावकर. (६१) कॅजीराम बुवा लाखे, शिरवळ. (६२) श्री. शिवाजी पांढरे, ढवळीपूर. (६३) श्री. दत्तोबा पवार, सातारा. (६४) श्री. पमाजी धामणीकर, ढवळपूरी. (६५) श्री. ज्ञानेश्वर कैलास, घोडेगाव. (६६) श्री. मुन्ना शेख, जुन्नर. (६७) श्रीमती मन्नीबाई, शिरडी. (६८) श्री. रामदास भाऊसाहेब काकटकर. (६९) श्री. ज्ञानबा तात्या वाडेकर, शिरडी. (७०) श्री. निवृत्ती शंकर रणवले, श्रीरामपूर. (७१) श्री. संभाजी भिकाजी थोरात, चाकुर्डी. (७२) श्री. लक्ष्मण महादेव गोरे. (७३) श्री. कोंडीराम लक्ष्मण आवळे. (७४) श्री. शहाजी भिकाजी थोरात, सांगली. (७५) श्री. लक्ष्मण बाबूराव नवले, शिरवळ. (७६) श्री. वसंत विठोबा लौकेर, पुणे. (७७) श्री. गंगाधर किसनराव गंगापूरकर. (७८) श्री. नाना गणपत थोरात, चाकुर्डी. (७९) श्री. बाबूराव तुकाराम कांबळे. (८०) श्री. एस. एस. पिसे, राहाता. (८१) श्री. हमराज नारायण म्हात्रे. (८२) श्री. ज्ञानेश्वर संतू ठोंबरे. (८३) श्री. वसंत दामोदर रासने, पुणे. (८४) श्री. वसंत नाना कळसे. (८५) श्री. रामभाऊ अदवानकर, पंढरपूर. (८६) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. (८७) कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे, मांजरवाडीकर तमाशा मंडळ, पुणे. (८८) श्री. अरविंद पवार, मुंबई. (८९) श्री. अरविंद जामसंडेकर, मुंबई. (९०) श्री. अरुण उबाळे, (९१) श्री. शरद गायकवाड. (९२) श्री. राजेंद्र मिश्रा. (९३) श्री. दत्ताराम साबळे. (९४) श्री. रमेश दळवी. (९५) श्री. शशीकांत दळवी. (९६) श्री. सतीश राव. (९७) श्री. विलास महाडीक, मुंबई. (९८) श्री. बारकूशेठ मांडवकर, मुंबई. (९९) श्री. सुरेश आंजर्लेकर. (१००) डॉ. शशीकांत कुलकर्णी. (१०१) श्री. वसंत जोशी. (१०२) श्री. वसंत नाईक. (१०३) श्री. विलास पावसकर. (१०४) श्री. बारवकर ब्रदर्स, शिरडी. (१०५) श्री. रघुनाथ नागरे. शिरडी. (१०६) श्री. शाम मिराणे. (१०७) श्री. माणिक साळी. (१०८) श्री. आनंद दत्तात्रय करंबेळकर. (१०९) श्री. चतुर्भुज नागरे,

शिरडी. (११०) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिरडी. (१११) श्री. अनुप जलोटा, मुंबई. (११२) श्री. प्रदीप आचार्य. (११३) श्री. गुरुदीप सिंग. (११४) श्री. घुमकर व (११५) श्री. बी. बी. गंगावणे रोवर्स अँड रेंजर्स लीडर्स, मुंबई. (११६) श्री. डी. क्रियाडो, (११७) श्री. जे. पी. भोसले (११८) श्री. व्ही. आर. वडनेरे. (११९) श्री. जी. पी. नवघरे. (१२०) श्री. परमजितसिंग. (१२१) श्री. इ. जे. विलीयम. (१२२) श्री. एस. पी. नेटके. (१२३) श्री. बी. एन. खिलारे. (१२४) श्री. सी. एस. नाईक. (१२५) श्री. ए. जी. खानरकटे. (१२६) श्री. आर. के. मेवालाल. (१२७) श्री. आर. एस. दगडे. (१२८) श्री. व्ही. बी. खिरोरिया. (१२९) श्री. ए. जे. कदम. (१३०) श्री. एस. बी. परब. (१३१) श्री. सी. जी. आंबीकर. (१३२) श्री. जी. आर. वरळीकर. (१३३) श्री. जे. एच. वरळीकर. (१३४) श्री. अनिल माखीजा. (१३५) श्री. व्ही. व्ही. ठाकूर. (१३६) श्री. एस. एस. प्रधान. (१३७) श्री. वाय. ए. पाटील. (१३८) श्री. राजाराम कदम. (१३९) श्री. अनिल जरीम. (१४०) श्री. डी. पी. सिंग. (१४१) श्री. वाय. के. बासर. (१४२) श्री. एस. डी. कदम. (१४३) श्री. जे. डी. शेजकर. (१४४) श्री. चंद्रकांत कदम. (१४५) श्री. एस. एस. जगताप. (१४६) श्री. महेंद्र शेळके. (१४७) श्री. आर. गांगुली. (१४८) श्री. डब्ल्यु. ए. शेख. (१४९) श्री. एस. सूर्यवंशी. (१५०) श्री. मुकुंद म्हात्रे. (१५१) श्री. प्रदीप प्रधान. (१५२) श्री. राजेंद्र वानखेडे. (१५३) श्री. ए. पी. पंडीत. (१५४) श्री ए व्ही वेदक (१५५) श्री एल. एम देशपांडे (१५६) श्री. एम. आर. हलवाई (१५७) श्री. बाबूभाई पांचाल (१५८) श्री. अनंत पाटील (१५९) श्री. उदय पाटील. (१६०) श्री. नरेंद्र यादव. (१६१) श्री. बाबुराव धर्वे. (१६२) श्री. केशव परुळेकर. (१६३) श्री. नितीन तुळस्कर. (१६४) श्री. सचिन बाणे. (१६५) श्री. वासुदेव गावडे. (१६६) श्री. विनायक साठे. (१६७) श्री. गजानन शिरकर. (१६८) श्री. सबनीस. (१६९) श्री. शरद तुळस्कर. (१७०) श्री. रमेश चुरी. (१७१) श्री. शामसुंदर दवणे. (१७२) कुमारी तनुजा गिरकर. (१७३) कु. हेमा गायकवाड. (१७४) सौ. हीराबाई गायकर. (१७५) श्री. मधुकर रामचंद्र खापरे, मुंबई. (१७६) श्री. शिवदास शिरोडकर. (१७७) श्री. सुभाष कांबळी. (१७८) श्री. सुधाकर बाटेकर. (१७९) श्री. आत्माराम उतेकर. (१८०) श्री. नागेश वेलणेकर. (१८१) कै. दत्तोबा तांबे, लोकनाट्य, पुणे. (१८२) श्री. विलास परळकर, मुंबई. (१८३) श्री. रामचंद्र शंकरराव जोशी, शिरडी. (१८४)

श्री. महेश सावर्डेकर, मुंबई. (१८५) श्री. शाहू भोसले, साईधाम, मुंबई. (१८६) श्री. शिवराम सावळाराम कळमगाव. (१८७) सुरसंगम ऑर्केस्ट्रा, मुंबईचे कलाकार. (१८८) श्री. उल्हास नाचणकर. (१८९) श्री. निनाद सामंत. (१९०) शोभा निनाद सामंत. (१९१) श्री. सुरेश खत्री. (१९२) श्री. मनूभाई कांबळी. (१९३) श्री. नरोत्तम मिस्त्री. (१९४) श्री. भालचंद्र (१९५) श्री. प्रेमा भट. (१९६) श्री. सुधाकर वुडबाडकर. (१९७) श्री. नितीन खत्री. (१९८) श्री. धर्मेश कांबळी. (१९९) श्री. शाहू भोसले. (२००) श्री. राजेंद्र सांकला. (२०१) श्री झंबालाल सांकला. (२०२) सौ. पद्मा कुलकर्णी. (२०३) श्रीकृष्ण भार्गव जोशी. (२०४) श्री. सुधा रामन्ना. हैद्राबाद. (२०५) श्रीसंत मुक्ताआई भजनी मंडळ, सोलापूर.

**उद्घाटन व भूमिपूजन समारंभ :**

गुढी पाडव्याचे शुभमुहूर्तावर संस्थानने साठ लाख रुपये खर्चून नव्याने बांधलेल्या भव्य वास्तूचे उद्घाटनाचा कार्यक्रम दि. २ एप्रिल १९८४ रोजी संपन्न झाला.

संस्थानने श्रीसाई–भक्तांचे निवासाकरिता बांधलेल्या भव्य वास्तूचे (डॉरमेटरी) श्रीसाईनाथ रुग्णालयाचे नव्याने बांधलेल्या रुग्णालय, कर्मचारी निवासस्थान व अतिथीगृह या इमारतींचे उद्घाटन मा. श्री. एस. बी. सोनार, जज्ज सिटी सिव्हिल अँन्ड अँड सेशन्स कोर्ट मुंबई यांचे शुभहस्ते व मा. श्री. अनिलकुमार लखीना, जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे, शासकीय अधिक्षक श्री. द. चिं. पाठक, संस्थान आर्किटेक्ट श्री. तलगिरी, कॉन्ट्रॅक्टर श्री. देवजीभाई पटेल, श्री. डी. बागवे, श्री. शहाडे, संस्थान चीफ इंजिनियर श्री. डी. सी. पाटील, श्री. मिराणे इ. ची यथोचित भाषणे झाली.

तसेच दि. २–४–८४ या शुभदिनी संस्थान कर्मचाऱ्यांकरिता बांधावयाचे तिसऱ्या कर्मचारी निवासस्थानाचे इमारतीचा भूमिपूजन समारंभ श्री. व्ही. एस्. आपटे, मुख्य लेखाधिकारी, मुंबई यांचे शुभहस्ते व मा. श्री. द. चिं. पाठक शासकीय अधिक्षक शिरडी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

## नांदा सौख्यभरे

श्री साईबाबा मंदिर शिरडीच्या श्रीसाई मंदिराचे व्यवस्थापक श्री. विठ्ठलराव विष्णूपंत बागवे यांची पुतणी व संस्थानच्या मुंबई कचेरीतील श्री. दत्तात्रय विष्णू बागवे यांची कन्या चि. सौ. कां. राजश्री हिचा शुभविवाह चि. अनिल (कै. नारायण रामचंद्र सावंत, मु. पांघट) यांजबरोबर मंगळवार दि. २२-५-८४ रोजी लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, शिवाजी पार्क, दादर येथे थाटाने साजरा झाला. वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी साईभक्त व विविध क्षेत्रातील मंडळी शहरात दंगलीचे वातावरण असूनही बहुसंख्येने हजर होती. आम्हीही वधुवरांना सुखाचा संसार चिंतितो.

**संत भाऊमहाराज कुंभार पुण्यतिथी :-**

श्रीसाईभक्त संत भाऊमहाराज कुंभार यांची पुण्यतिथी सालाबादप्रमाणे चैत्र वद्य ॥१२॥ दिनांक २७-४-८४ रोजी साजरी करणेत आली.

## माजी रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांची पंचाहत्तरी

शिरडी संस्थानचे माजी कोर्टरिसिव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांनी दि. १३-५-८४ रोजी ७५ वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त मंगळवार दि. १५-५-८४ रोजी त्यांचे घरी त्यांचा वाढदिवस घरगुती स्वरूपात साजरा करण्यात आला. श्रीसत्यनारायणाची पूजा व श्री. मार्कण्डेय ऋषीची पूजा असा कार्यक्रम होता. पुण्याह वाचनास श्री. पाठक, व सौ. इंदिराताई पाठक बसल्या होत्या. पौरोहित्य श्री. मधुसूदन वामन करंबेळकर यांनी केले. श्री साईनाथ कृपे त्यांची तब्येत चांगली असून ते आनंदी आहेत. श्रीसाईसमर्थ त्यांना शतायु करोत ही प्रार्थना.

**श्री. हरी बाळा शिंपी, माजी चोपदार यांचे निधन :-**

श्रीसाईबाबा संस्थान समाधी मंदिरात चोपदार म्हणून काम करीत असलेले श्री. हरी बाळा शिंपी यांचे दि. ४-४-८४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा जन्म १९१४ साली झाला व ते संस्थानमध्ये १०-१०-५१ साली नोकरीस लागले. व ३१-१२-७८ रोजी सेवानिवृत्त झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७० वर्ष होते.

ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.



श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी, येथील कर्मचारी निवासस्थानाच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम साईबाबा संस्थानचे मा. श्री. वि. श्री. आपटे चिफ् अकौन्टस ऑफिसर व कार्यालय अधिक्षक मुंबई कार्यालय यांचे शुभहस्ते गुढीपाडव्याचे सुमुहूर्तावर पार पडला त्या वेळचे छायाचित्र

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

| | | | |
|---|---|---|---|
| ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ” | मराठी | १–५० | ३–०० |
| शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ” | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| रुद्राध्याय | मराठी | ०–९० | ३–०० |

श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी
१०–०० प्रत्येकी प्रत १–००
(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १–६५ | ३–०० |
| २) | ” | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ” | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ” | ४"×५" | ०–२० | ३–०० |
| ५) | ” | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ” (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०० |
| ९) | ” | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–०० |
| ११) | ” (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ” (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई १४.